विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१६ |
| वर्ष | : | एक्कावनवे |
| अंक | : | तिसरा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

## गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१६

## गणपत्रिका क्रमांक : १८९

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : एक्कावनवे अंक : तिसरा आश्विन / कार्तिक शके १९३८, ऑक्टोबर २०१६

## *संपादकीय*

# आजच्या 'उन्मादी' उत्सवांच्या पार्श्वभूमीवर 'धर्म' आणि 'परंपरा'

'धर्म ही अफूची गोळी आहे' या मार्क्सच्या वचनाशी, त्यांच्या 'अर्थ' आणि 'साम्यवादी' सिद्धांताशी मतभेद असलेल्या विचारवंतांनाही सहमत व्हावे लागेल. वास्तविक 'धर्म' हा आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनामध्ये अधिकाधिक सुसंगती आणण्याचा प्रयत्न करत असतो. याकरता शिक्षण, संस्कार इत्यादींच्या माध्यमातून सामाजिक जबाबदाऱ्या आणि सारासार विवेकबुद्धीची मशागत करण्यात येत असते. अगदी बाल्यावस्थेपासून वृद्धावस्थेपर्यंत आपण अनेक अनुभवांतून संक्रमीत होत असतो. अनुभवाला कुठल्याही पुराव्याची गरज नसते. खऱ्या सहिष्णुतेची सुरुवात या अनुभवांतूनच होते.

नैसर्गिकरित्या मनुष्य हा आत्मकेंद्रित आहे. पण त्याचे जगणे हे बहुकेंद्रित असल्यामुळे आपल्या परिसराचाही विचार त्याला करावा लागतो. या जाणिवेतूनच संस्कृतीची वीण बांधली जाते. आपला परिसर आणि निसर्गक्रमाचे नित्यत्व आणि त्याचे परस्परावलंबित्व याचीही जाणीव त्याला वाढत्या वयाबरोबर होत असते. ऊन, पाऊस, वारा हे केंव्हाही उग्रस्वरूप धारण करू शकतात हेही तो अनुभवांतूनच शिकत असतो. यामुळेच 'दृष्टी' आणि 'तर्का'पलीकडे असलेल्या या घटकांपुढे नतमस्तक होण्यापलीकडे माणसाकडे दुसरा कोणताच पर्याय नसतो. या शक्तींची 'स्तुती' आणि 'विनवणी' यांचा उगमही या अगतिकतेतच झाला असणार. आपल्या प्राचीन साहित्यामध्ये याच्या खुणा जागोजागी आढळतात. या शक्तींची पुढे 'दैवत' होतात. या दैवतांशी संवाद साधण्याच्या प्रक्रियेतूनच 'सण' आणि

(पृष्ठ क्र. २८ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| **बँक** | **शाखा** | **खाते क्र.** | **बँक IFSC कोड** |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | **10884930955** | **SBIN 0009056** |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | **002115000024520** | **TBSB 0000002** |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

<u>देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.</u>

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **<u>फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.</u>**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४००६०१. दू.क्र : २५४७२००५, भ.क्र.:९८१९६९३१९५
अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । श्रीभीमाशंकर । | ६ |
| गीतकृष्णायन-भाग ४- योगेश्वर | ७ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र | १० |
| ''वृक्षोपनिषद'' | १२ |
| 'आरोग्य, शरीरस्वास्थ्य आणि 'वेदविद्या' | २० |


**जुलै ते सप्टेंबर २०१६**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

मोडक विश्वनाथ दिनकर, ठाणे

सहस्त्रबुद्धे श्रीकांत गजानन, ठाणे

देवस्थळे विराज विठ्ठल, मुंबई

लेले किशोर वसंत, कुडाळ

सौ. अर्पणा उदय कुलकर्णी, नाशिक

श्रीमती रजनी अशोक कोल्हटकर, मुंबई

**विशेष देणगी**

भागवत श्रीधर भालचंद्र – रु.१०००/–

**–संपादक**

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०)उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

आपणास कांही नवीन विषय, विचार सुचल्यास ते सध्दर्म वाचकांसमोर मांडले जावेत असे वाटत असेल तर अधिक तपशीलासह कृपया सध्दर्मशी संपर्क साधावा अशी विनंती आहे. आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती – बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते. जर नोंद घेणे राहून गेले असेल तर बँकेत रकमे व्यतीरिक्त संपूर्ण नोंद येत नसल्याने नोंद झाली नसावी. संदर्भ मिळताच नोंद करता येईल. देणगीदारांनी याची नोंद घ्यावी. गेल्या आर्थिक वर्षात ५ ते ७ अशा नोंदी आहेत, त्या कमी करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आपण सहकार्य करावे.

**– कार्यकारी विश्वस्त**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख २८ वा

**सर्वस्य लोचनं शास्त्रम्।**[३४८]

शास्त्र हा सर्वांचा डोळा आहे.

**सर्वस्य लोचनं शास्त्रं, यस्य नास्त्यन्ध एव सः।।**
दुसरी ओळ

**अनेक संशयच्छेदि परोक्षार्थस्य दर्शकम्।**
पहिली ओळ

अनेक संशयांचे निराकरण करणारे शास्त्र हा मानवाचा डोळाच आहे. हा डोळा ज्याला नाही तो आंधळाच.

**सुलोचना जीर्ण पटापि शोभते।**[३४९]

सुंदर स्त्री मीनाक्षी, मृगनयना फाटक्या कपड्यातही शोभून दिसते.

**वरं दरिद्रः श्रुतिशास्त्रपारगो**
**न चापि मूर्खो धनरत्नसंयुता।**
**सुलोचना जीर्णपटापि शोभते**
**न नेत्रहीना कनकैरलङ्कृता।।**

श्रुती स्मृती शास्त्र शिकलेला दरिद्री चालेल, पण धनयुक्त मूर्ख नको. सुंदर स्त्री सामान्य कपड्यातही सुंदर दिसते. पण आंधळ्या स्त्रीला दागिन्यांनी मढवले तरी ती
८ सुंदर दिसणार नाही.

**संसर्गजा दोषगुणा भवन्ति।**[३५०]

ढवळ्या शेजारी बांधला पवळा, वाण नाही पण गुण लागला.

**गवाशनानां स शृणोति वाक्यं**
**अहं च राजन् वचनं मुनीनाम्।**
**नास्त्यस्य दोषो, न सद्गुणो वा**
**संसर्गजन्या दोषगुणा भवन्ति।।**

एक पोपट राजाला सांगतो – हे राजा, तो (माझा भाऊ दुसरा पोपट) याच्या कानावर सतत कसयांनी बोललेले शब्द पडत असतात आणि मी ऋषींचे शब्द ऐकतो. तो शिवराळ शब्द बोलतो, मी सुसंस्कृत बोलतो हा सहवासाचा गुण आहे हे लक्षात घे.

**अविवेकः परमापदां पदम्।**

अविचार हे महान संकटाचे मूळ आहे.

**सहसा विदधीत न क्रियाम् आविवेकः परमापदां पदम्।**
**वृणते हि विमृश्यकारिणं, गुणलुब्धाः स्वयमेव सम्पदा ।।**

अविचाराने, घाईने कोणतेही काम करु नये कारण ते संकटाचे मूळ असते. जो विचार करून शांततेने कार्य करतो, लक्ष्मी आपणहून त्याला वरते.

**शुनः पुच्छमिव व्यर्थं जीविनं विद्यया विना।**[३५२]

विद्येशिवाय जीवन कुत्र्याच्या शेपटाप्रमाणे व्यर्थ आहे.

दुसरी ओळ –
**न गुह्यगोपने शक्तं, न च दंशनिवारणे ।।**

कुत्र्याच्या शेपटाचा त्याला आपला गुप्त भाग झाकण्यास उपयोग होत नाही किंवा माशा वारायला ही त्याचा उपयोग होत नाही.

**उत्तमाः मध्यमाः अधमाः अधमाधमाः।**[३५३]

समाजात उत्तम, मध्यम, अधम आणि अधमाधम कोणाला म्हणायचे ?

**उत्तमाः आत्मना ख्याताः**
**पित्रा ख्याताश्च मध्यमाः।**
**मातुलेमाधमाः ख्याताः**
**श्वशुरेणाधमाधमाः।।**

आपल्या स्वतःच्या पराक्रमावर ख्याती मिळविणारे उत्तम. वडिलांच्या जिवावर मिळविणारे मध्यम, मामाच्या जिवावर मिळविणारे अधम आणि सासऱ्याच्या जिवावर ख्याती मिळविणारे अधमाहून अधम.

**शेषमन्यस्य रक्षसि। ३५४**

उरलेले जे आहे (ते धन) दुसऱ्यांसाठी तू राखीत बसतोस.

**यद्ददासि विशिष्टेभ्यो, यच्चाश्नासि दिने दिने।**
**तत्ते वित्तमहं मन्ये, शेषमन्यस्य रक्षसि।।**

तुझ्या पैशातून तू देणगी वगैरे देतोस, जे तुझ्या खाण्यापिण्यासाठी रहाण्या लेण्यासाठी पैसे खर्च करतोस तेच तुझे खरे धन, यातून उरलेले धन तू दुसऱ्यांसाठी सांभाळीत बसतोस.

**परोक्षे कार्यहन्तारं, प्रत्यक्षे प्रियवादिनम्।**[३५५]

तोंडावर गोडबोलायचे, पाठीमागे निंदा करायची (कार्यनाश करायचा)

**मुँह मे राम, बगल में छुरी।**

दुसरी ओळ –

**वर्जयेत् तादृशं मित्रं, विषकुम्भं पयोमुखम्।।**

असा हंडा की वर दूध दिसते आहे आणि आत विष, असा मित्र टाळावा.

क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

## मनोवृत्ति

कोट्याधीशापासून भिकाऱ्यापर्यंत सर्वजण शान्ततेची, शांततामय जीवनाची अपेक्षा करीत असतात. पण गंमत अशी कीं आपल्या शांततेकरतां दुसरीकडे अशांतता निर्माण करीत असतात. एकीकडे शांति भंग पावली तर तिचे दुष्परिणाम दुसरीकडे उमटतात. कारण ते शांततेचे प्रयत्न व्यक्तिनिष्ठ असतात, शिवाय ते केवळ भौतिक असतात. शांति ही बाह्यवस्तुनिष्ठ नसते, ती मनोनिष्ठ हे लक्षांत घेऊन आद्य शंकराचार्य म्हणतात- 'मनोनिवृत्तिः परमोपशान्तिः, मन भौतिक विषयांपासून निवृत्त झालें तर खरी शान्तता परमश्रेष्ठ सार्वत्रिक शांतता लाभते.

शांतपणें नासिकाग्रावर दृष्टि स्थिर करुन अदमासें दहा मिनिटें स्थिर रहा. पहिली नऊ मिनिटें मन विषयांशी खेळत राहील पण दहावें मिनीट विषय पराङ्मुख राहील. म्हणजेच शांत राहील. दहाव्या मिनिटाची ही मनोनिवृत्ति परमशांती आहे. खरीखुरी शांतता आहे. ती मिळवायचा प्रयत्न करा.

**यं डाकिनीशाकिनिकासमाजे**
**निषेण्यमाणं पिशिताशनैश्च।**
**सदैव भीमादिपदप्रसिद्धं**
**तं शङ्करं भक्तहितं नमामि ।।६।।**

अन्वय :- **यं डाकिनीशाकिनिसमाजे पिशिताशनैः निषेण्यमाणं भिमादिपदप्रसिद्धं तं भक्तहितं शङ्करम् अहं सदैवनमामि।**

भाषांतर : ज्याची डाकिनी, शाकिनी समाजातील पिशाच्च योनीज स्त्रिया, मांस भक्षण करणाऱ्या, नित्य सेवा करतात, भयंकर/ भीषण / रौद्र / भीम इत्यादी पदे ज्याच्या नावापूर्वी लागतात व त्यामुळे ज्याचे नाव भीमशंकर म्हणून प्रसिद्ध आहे, जो भक्तांचे हित करणारा आहे अशा या शंकराला मी सदैव नमस्कार करतो.

विवेचन-पिशिताशनैः - पिशितम् अश्नन्ति इति। मांस खाणारे. तैः त्यांच्याकडून प्राचीनकाळी त्रिपुरासूर नावाच्या राक्षसाशी शंकराचे तुंबळ युद्ध झाले. भगवान शंकरांनी महाप्रचंड असे भीमरुप धारण केले व त्रिपुरासुराला ठार मारले. त्यावेळी भीमकायशंकर खूप थकले व ते सह्याद्रिच्या उंच भागावर जाऊन बसले. त्यावेळी त्यांच्या अंगातून घामाच्या सहस्त्रधारा वाहू लागल्या. तीच भीमरथी नदी. तिचे नाव भीमा व त्यामुळे शंकराचे भीमाशंकर असे नाव प्रचलित झाले. त्रिपुर राक्षसामुळे व त्रिपुरारी असेही नाव रुढ झाले. तेव्हापासून त्रिपुरी पौर्णिमा पण चालू झाली जी अद्यापही आहे.

भीमाशंकर हे स्थान मुंबईपासून २६० किलोमीटर अंतरावर आहे व मोटरने ५ ते ७ तास पोचायला लागतात. पुणे, रायगड आणि ठाणे या परिसरात ते मोडते. खांडस खेड्यातून गणेश घाटाद्वारा तिथे पोचता येते. हा भाग वन्यजीवनासाठी खूप प्रसिद्ध आहे. येथे अनेक बेडकांच्या जाती, सापांच्या जाती, पक्ष्यांच्या निरनिराळ्या जाती आहे. मलबार ग्रे हॉर्नबील, ग्रिन पिजन, ब्लॅक इगल इत्यादी. जंगलात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आढळून येतात.

इति शम्।

क्रमशः।

**दि. दा. औटी**

●●●

**ताईत आणि फांसे...**

ज्या नखांनी सिंह मदोन्मत्त हत्तींची गंडस्थळे विदीर्ण करतो, तीच नखे पुढे मुलांच्या गळ्यात ताईत म्हणून घातली जावीत...

आणि ज्या सुळ्यांनी हत्ती सिंहासारख्या वनराजांनाही भोसकून ठार करतो, तेच सुळे फासे बनून जुगाऱ्याच्या हाती पडावेत...

ह्याला दैवदुर्विलासच म्हणायचे, दुसरे काय?

**'नरकासुर वध' – जाती धवलचंद्रिका**

साधुजना रक्षियले दैत्य मारले
हरिने द्वापारयुगी विश्व तारले ।। धृ ।।

नरकासुर दैत्य प्रबल हारि जेधवा
सुरमाता अदितीकुंडलांस तेधवा
स्वर्गाहुनी इंद्राने दूत धाडले ।।१ ।।

आश्वसून इंद्रदूत पाठवी हरी
समरांगणि जाण्यास्तव सज्ज रथ करी
युद्धकुशल भामेने अश्व हाकले ।।२।।

प्राग्ज्योतिष नगरिमाजि कृष्ण पातता
सांगे नरकासुरास देइ मुक्तता
कारागृहि अबलां ज्या तूच घातले ।।३।।

आणिक तू परतोनी देइ कुंडले
सुरमातेकडुनी जी घेतली बळे
प्राणांचे मूल्य जरी काहि वाटले ।।४।।

शत्रुंजय कृष्णा जव दैत्य ऐकतो
गर्वाने वदला मज कोण रोखतो
कृष्णा का भामेचे कुंकू पूशिले ।।५ ।।

निसुंदादि सेनापति हरिला भिडती
मात्र तया हरिसमोर होतसे गती
वादळात शुष्क पर्ण काय थांबले ।।६ ।।

करण्या मग नरकासुर युद्ध ठाकला
शस्त्रांनी शब्दांनी अग्नि वर्षला
घोर यत्न कृष्णाला वधण्या केले ।।७ ।।

तुळणा त्या संग्रामा भूवरी नसे
रणचंडी नर्तन जणु मूर्त त्या मिसे
हरिचक्रे असुराचे शीर छेदले ।।८ ।।

भगदत्ता सिंहासनि कृष्ण बैसवी
शुष्क द्रुमा फुटली जणु पालवी नवी
कृष्णाने भुवरि धर्मराज्य स्थापिले ।।९।।

बंदिवान नारींची होइ मुक्तता
स्विकरुन त्या अबलांना देइ मान्यता
देत फिरुन अदितीला कृष्ण कुंडले ।।१०।।

सावधान चित्ती परिसावे रसिका
काव्याची जाति असे धवलचंद्रिका
हरिदासे लीन होत गीत गाइले ।।११।।

कृष्णानं सत्यभामेला आवर्जून आपल्याबरोबर अमरावतीला यायला लावलं. पारिजातकाची फुलं तिला अतिशय प्रिय आहेत हे तो जाणून होता. त्याचं एक रोपटं तिच्या अंगणात लावण्यासाठी अमरावतीहून घेऊन दोघं द्वारकेला परतली.

कृष्णाला नरकासुरावर विजय मिळावा म्हणून इथे रुक्मिणीनं कडकडीत असिधारा व्रत केलं होतं. परतताच कृष्णाला आढळून आलं की त्यामुळं रुक्मिणी अतिशय कृश झाल्येय. तिला प्रेमातिशयानं आलिंगन देऊन त्यानं विचारलं, प्रिये, तुला काय हवं ते तू माग.

यावर रुक्मिणी कृष्णाचे चरण स्पर्शून म्हणाली, जन्मोजन्मी आपली चरणसेवा करण्याचं भाग्य मला लाभेल असा मला आशीर्वाद दयावा.

कृष्णानं मग खूप थाटामाटात रुक्मिणीच्या व्रताचं उदयापन केलं. हे सर्व पाहून सत्यभामेच्या मनात असूया निर्माण

झाली. आपणही असंच व्रत करून कृष्णाची मर्जी संपादन करावी, अनेक जन्मांचा सहवास मिळवावा असं तिला तीव्रतेनं वाटू लागलं. एके दिवशी तिनं ही इच्छा नारदमुनींजवळ बोलून दाखवली.

नारद लगेच सुचवते झाले, एक पुण्यक नावाचं महाव्रत आहे. करायला सोपं पण परम लाभदायक! एक दिवस उपवास करायचा, दुसऱ्या दिवशी एका ब्राह्मणाला जेवू घालायचं आणि दक्षिणा म्हणून आपला पती दिला असं म्हणायचं. ज्या पतिव्रता असं करतात त्यांना पुढचे सात जन्म तोच पती लाभतो असं या व्रताचं वैशिष्ट्य आहे.

सत्यभामा ते ऐकून उत्साहानं म्हणाली, मग उद्याच मी हे व्रत करून टाकते. ब्राह्मण शोधायलाही फार लांब जायला नको. अनायासे आपण आहातच.

जशी तुझी इच्छा, भामे! मिस्किलपणे नारद म्हणाले.

मग बराच गाजावाजा करून सत्यभामेनं दुसऱ्याच दिवशी उपवास केला. तिसऱ्या दिवशी पुरणावरणाचा स्वयंपाक करून नारद, कृष्ण आणि त्याच्या इतर भार्यांसहीत सर्वांची मोठी पंगत उठवली. भोजनोत्तर तांबूल सेवन करता करता नारद म्हणाले, बरं मग आता भामे, तू दक्षिणा दिलीस की मी द्वारकेतला मुक्काम हलवावा म्हणतो.

लागलीच भामेनं कृष्णाला पारिजातकाच्या झाडाला सुतानं बांधून तीन वेळा पाणी सोडलं, नारदा, मी माझे पती तुम्हाला दिले, दिले, दिले.

कृष्णाभोवतीचं सूत काढल्यावर आपली वीणा कृष्णाच्या हाती देऊन नारद त्याला म्हणाले, चल कृष्णा, आपल्याला निघायला हवं. कृष्णही वीणा खांद्यावर लटकावून साळसूदपणे त्यांच्या मागे जाऊ लागला.

धसकून भामा म्हणाली, नारदा, हे काय करताहात? आणि अहो तुम्हीसुद्धा त्यांच्यामागून कुठे निघालात?

यावर नारद म्हणाले, म्हणजे? तू कृष्ण मला दान केलास ना? आता तो माझा सेवक झालाय. तो सदोदीत आता माझ्यामागूनच येईल!

रडवेली होऊन भामा म्हणू लागली, अहो पण मला तर वाटलं की हा एक केवळ उपचार आहे म्हणून! हेसुद्धा सारं सोडून खरंच तुमच्यामागून निघाले की हो! हे देवा, आता मी काय करू? आणि नारदा, तुमच्यामागून फिरून हे तरी काय करतील?

चेहऱ्यावरची गंभीरता ढळू न देता नारद भामेला म्हणाले, कृष्ण काय करेल म्हणजे? माझी जी काही इच्छा होत जाईल तसतसं आता त्याला करावं लागेल...

**'नारद उवाच' – जाती धवलचंद्रिका**

दान दीधलास व्रतामाजि पुण्यक
प्राप्त आज नारदास नम्र सेवक ।। धृ ।।

सोडुनी समस्त संग दास श्रीहरी
घालुनी विणा गळयात ये बरोबरी
तो मला सदैव तुष्ट ठेवण्या करी
यत्न ते जरी किती असोत जाचक ।।१।।

श्रीहरिने धान्य वा धनास याचिले
भावभक्तिने जरीच वस्त्र मार्जिले
ईशपूजना मला फुलांस आणिले
अर्चना मला ठरेल पुण्यकारक ।।२।।

लेप दे तनूस उगाळून चंदन
श्रांत जाहल्यास मी करून मर्दन
वाटले करू वनी निवास आपण
वाचवील तो मला बनून रक्षक ।।३।।

राहण्या मला हरी कुटीस बांधता
माझिया क्षुधेस पूर्ति अन्न रांधता
वाटते नसावि या सुखास सांगता
दास कृष्ण मीच भाग्यवंत मालक ।।४।।

जन्म हा तयाविनाच काढशी जरी
ना धरी तुझ्या मनात संशया तरी
सात जन्म लाभतो तुला पती हरी
या व्रतापरी असे न अन्य तारक ।।५।।

नारदांच्या आश्वासनानं सत्यभामेचं मुळीच समाधान झालं नाही. ती त्यांना निर्धारानं म्हणाली, पुढच्या सात जन्मांच्या संगतीसाठी मी काही हयांची या जन्माची संगत सोडणार नाही. काय वाटेल ते झालं तरी मी हयांना तुमच्यामागून एक पाऊल काही टाकू दयायची नाही.

नारद म्हणाले, काय करशील ते विचार करून कर बरं भामे. हे व्रत नीट पार पाडल्यावर जितका लाभ करून देतं तितकीच हानी ते पूर्ण न केलं तर होऊ शकते! जर मला दिलेली दक्षिणा तू परत घेतलीस तर ते पतिव्रता धर्माला फारच सोडून होईल. तुझ्यावर, तुझ्या पतिदेवांवर आणि एकूणच द्वारकेवर भयंकर अरिष्टं कोसळतील. त्यांचा सामना करायला तयार रहा म्हणजे झालं.

बिचाऱ्या भामेला इकडे आड आणि तिकडे विहीर असल्यासारखं झालं. ती खूप रडली, रोवली! तिनं नारदांचे पाय धरले पण तरीही ते ऐकेनात! तिनं कृष्णाच्या विनवण्या केल्या पण तोही म्हणाला, केवळ या जन्मापुरतं मर्यादीत असलेलं तुमचं प्रेम आणि हे क्षणभंगूर राजवैभव आता मला थांबवू शकत नाही. यदुकुळातल्या पतिव्रतेचा शब्द खोटा ठरू नये यासाठी मी काय वाटेल तो त्याग करीन!

शेवटी भामेनं सारा मानापमान बाजूला ठेवून रुक्मिणीच्या कुशीत तोंड खुपसलं आणि मुसमुसत म्हणाली, बाई, माझ्या मूर्खपणाचं प्रायश्चित्त मला मिळालं. आता तुम्हीच माझी यातून सुटका करा.

मग रुक्मिणीनं पुढं होऊन नारदांना नम्रपणानं विचारलं, मुनिवर्य, काही पर्यायी दक्षिणा देण्याची व्यवस्था या व्रतामधे असल्यास सांगण्याची कृपा करावी.

यावर नारद म्हणाले, आहे की! पण म्हटलं कोणी विचारल्याशिवाय आगंतुकपणा करून आपण कशाला सांगा! आता तू विचारतेच आहेस म्हणून सांगतो की कृष्णाऐवजी त्याच्या वजनाएवढं सोनं मला दिलंत तरी चालेल. हे व्रत पूर्ण होईल.

हे ऐकताच सत्यभामेचा अहंकार परत एकदा उफाळून वर आला. झटकन डोळे पुसत ती म्हणाली, एवढंच ना! मग ठीक आहे तर. द्वारकेच्या सम्राज्ञीला हे काही फार जड नाही. मी आत्ताच्या आत्ता यांची सुवर्णतुला करून टाकते आणि व्रतपूर्ती करते...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

लेखांक - ३

मागील लेखात 'राष्ट्र' ही संकल्पना व ज्या सात घटकांनी राष्ट्र ही सुसूत्र आणि एकजिनसी संस्था उत्क्रांत झाली त्याचा विमर्श घेतला. या घटकांपैकी 'राजा' (स्वामी) या घटकाला अग्रक्रम दिलेला दिसतो. राजा हा राज्यसंस्थेचा केंद्रबिंदू आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. 'राजा' या राज्याच्या सर्वात महत्त्वाच्या घटकाविषयी या लेखात जाणून घेऊ.

**'राजा' या शब्दाची व्युत्पत्ती –**

'राजा' हा शब्द 'राज्' म्हणजे प्रकाशणे या क्रियापदापासून सिद्ध झाला आहे. पारंपारिक विचार सरणीनुसार राजा ईश्वरी अंशापासून निर्माण होतो. त्यामुळे तेजस्विता हा गुणधर्म राजामध्ये असणे स्वाभाविक आहे. या विश्वासाला धरुन वरील व्युत्पत्ती पटण्यासारखी आहे.

महाभारतात 'राजा' शब्द 'रञ्ज्' म्हणजे संतुष्ट ठेवणे या धातुपासून सिद्ध झाला आहे असे म्हटले आहे. प्रजेला संतुष्ट ठेवतो, प्रजेचे रंजन करतो तो राजा असा या व्युत्पत्तीचा अर्थ आहे. (राजा प्रकृतिरञ्जनात्।)

**राजा या संकल्पनेची निर्मिती आणि आवश्यकता –**

'राजा' या संकल्पनेचा विचार करताना प्रश्न निर्माण होतो की राजाची आवश्यकता का निर्माण झाली असावी?

या प्रश्नाचा विचार प्राचीन संस्कृत ग्रंथांत केलेला दिसतो. ऐतरेय ब्राह्मणात म्हटले आहे की 'देवांच्या लक्षात आले की राजा नसल्यामुळे आपला पराभव होतो म्हणून सर्वानुमते त्यांनी राजाची निवड केली' म्हणजे युद्धप्रसंगी खंबीर नेतृत्वाची आवश्यकता भासल्यामुळे राजाची निर्मिती झाली.

मनुस्मृतीत म्हटले आहे की 'राजा नसल्यामुळे जगात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. अराजक माजले म्हणून जगाच्या रक्षणासाठी विविध देवतांच्या अंशापासून ईश्वराने राजाची निर्मिती केली आणि त्याच्याकरिता 'दण्ड' म्हणजे कायदा अथवा शासन करण्याची शक्तीही निर्माण केली. थोडक्यात कायदा आणि सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी तसेच सर्वांच्या रक्षणासाठी राजाची निर्मिती झाली.

महाभारतानुसार 'कोणाही व्यक्तीने प्रथम राजा मिळवावा नंतर पत्नी आणि त्यानंतर संपत्ती'. याचा अर्थ पत्नी म्हणजे कुटुंबसंस्था आणि संपत्ती म्हणजे खाजगी मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी राजाची आवश्यकता आहे ही जाणीव प्राचीन काळीही होती असे दिसून येते.

थोडक्यात सामाजिक घटकांचे रक्षण, धारण, नियोजन यासाठी राजाची आवश्यकता भासली. याची पूर्तता करण्यासाठी राजाची उत्पत्ती कशी झाली हाही विचार प्राचीन ग्रंथात केला आहे.

**राजाची उत्पत्ति व त्याविषयीचे सिद्धांत –**

सर्वात प्राचीन अशा ऋग्वेद या ग्रंथापासून राजाला त्याची सत्ता देवांकडून प्राप्त झाली असे मत दिसून येते. 'त्रसदस्यु' राजा स्वतःला देवसमूहातील सर्वशक्तिमान देव मानत असे, असे ऋग्वेदात म्हटले आहे. तर शतपथब्राह्मणात राजा हा प्रजापतीचा प्रतिनिधी असतो असे म्हटले आहे.

मनुस्मृतीनुसार, पूर्वी अराजकाची परिस्थिती निर्माण झाली तेव्हा इंद्र, यम, सूर्य, चंद्र, अग्नि, विष्णू या देवतांच्या अंशापासून राजाची निर्मिती केली गेली.

राजाच्या उत्पत्तीविषयी दोन कथा महाभारतात येतात. या दोन्ही कथांत अराजकाच्या निर्माण झालेल्या परिस्थितीला नियंत्रणात आणण्यासाठी राजाची निर्मिती देवांनी केली हाच विचार दिसतो. दुसऱ्या कथेत मात्र देवांनी निर्माण केलेला राजा 'मनु' व प्रजा यांच्यात करार झाला असाही तपशील येतो.

कौटिलीय अर्थशास्त्रातही कराराचा तपशील येतो तो पुढीलप्रमाणे – अराजकाने पीडित झालेल्या प्रजेने वैवस्वत मनूला राजा केले व प्रजेने मनु राजाला धान्याच्या उत्पन्नाचा सहावा भाग आणि विक्रेय वस्तूंचा दहावा भाग आणि द्रव्य असा वाटा द्यावा. या बदल्यात मनूने प्रजेच्या संरक्षणाची व योगक्षेमाची काळजी घ्यावी असा करार झाला. राजा पृथ्वीवर इंद्र आणि नियंत्रण ठेवणाऱ्या यम याप्रमाणे असतो असेही म्हटले आहे.

राजाच्या उत्पत्तिविषयी दैवी सिद्धांतापेक्षा वेगळी आणि लोकशाही पद्धतीशी मिळती जुळती संकल्पना अथर्ववेदात दिसते. त्यानुसार सरदार, सूत ग्रामाधिकारी, कुशल कारागिर, कुशल रथकार यांनी राजाची निवड केली असे म्हटले आहे. जनतेने राजाला निवडले असा सिद्धांत येथे दिसतो. इतिहासातही जनतेने राजाला निवडण्याचे पुरावे मिळतात.

अशारीतीने राजाच्या उत्पत्तिविषयी ईश्वराने राजाला निवडणे, राजा आणि प्रजा यांच्यात कर्तव्याविषयी करार होणे तसेच जनतेने राजाला निवडून देणे असे सिद्धांत प्रामुख्याने दिसतात. यांपैकी लोकांनी राजाला निवडून देण्याचे संदर्भ, दैवी उत्पत्तीपेक्षा कमी प्रमाणात आढळले तरी दोन्ही पद्धती अस्तित्वात होत्या हे निश्चित.

राजाचे महत्त्व निर्माण व्हावे, त्याच्याविषयी आदरयुक्त भीती वाटावी, त्याचा प्रभाव टिकून रहावा म्हणून कदाचित दैवी उत्पत्तीचा पुरस्कार प्राचीन ग्रंथांत केला असावा.

काही आधुनिक विचारवंतांच्या मतानुसार, कुटुंब व्यवस्थेतून ज्याप्रमाणे ग्राम, जनपद, नगर या व्यवस्था विकसित झाल्या तद्वत् कुटुंबप्रमुख, ग्रामप्रमुख या क्रमाने राजा, सम्राट इत्यादी संकल्पना काळाच्या गरजेनुसार निर्माण झाला असाव्यात. पिता ज्याप्रमाणे पुत्राची सर्वार्थाने काळजी घेतो तद्वत् राजाने प्रजेची काळजी घ्यावी हा विचार रामायण तसेच राज्यशास्त्राशी संबंधित इतर ग्रंथ इतकेच नव्हे तर संस्कृत काव्य-नाटकांतही दिसून येतो.

(पृष्ठ २७ वर)

''वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे'' हा संत तुकारामांचा अभंग निसर्गप्रेमाचे उत्तम उदाहरण आहे. पर्यावरणवाद त्यांनी समर्पकपणे सादर केला आहे. वृक्ष हे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व असलेले, निसर्गाने मानवाला दिलेले अमृत वरदान, एक जीवनछत्र, एक आधार. मानवी जीवन व वृक्ष यांच्यात एक अतूट नाते आहे. मानवाला अन्न, वस्त्र, निवारा या ज्या तीन मूलभूत गरजा आहेत, त्यांची एकसमयावच्छेदे पूर्ती करणारे हे निसर्ग देणे. अनादि कालापासून मानवी जीवनाचा अविभाज्य अंग असलेले, मानवाच्या ऐहिक व आध्यात्मिक जीवनात सतत साथ देणारे, सर्वांग उपयोगी पडणारे/ उपयुक्त असणारे, स्थितप्रज्ञ योग्यासारखे, वनचरे व पक्षी यांनाही अन्न, वस्त्र, निवारा देणारे, जाती, धर्म, वंश, लिंग, शत्रू-मित्र, गरीब-श्रीमंत, रोगी-निरोगी, साक्षर-निरक्षर, काळा-गोरा, खुजा-उंच इ. कसलाही भेदभाव न करता सर्वांना समभावनेने अंगाखांद्यावर खेळवणारे, वृक्ष हे केवळ मानवच नव्हे तर सर्व सजीवांचे जीवनदायी तत्व आहेत. वृक्ष संगोपन इ. सारखे कार्यक्रम सुरु केले व अनाठायी वृक्षतोड होऊ नये म्हणुन ''देवराया'' वगैरे सारखे उपक्रम धार्मिक श्रद्धांशी निगडित करुन त्या उपक्रमांना एक प्रकारे सजल अधिष्ठान दिले. भारतीय संस्कृतीत अश्या प्रकारचे वृक्षप्रेम अनादि कालापासून आहे, तसेच त्याचे संवर्धन करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. भारतीय सण, उत्सव आदीमधूनही वृक्षांना अधिष्ठान प्राप्त आहे. वृक्ष भारतीय संस्कृतीत मानाचे स्थान मिळवून आहेत.

फार फार पुरातनकाली वसुंधरेवर प्रचण्ड जंगले होती. घनदाट वृक्षराजीने सर्व जग व्यापले होते आणि कालांतराने भूपृष्ठावर भूकंपासारखे प्रचण्ड उत्पात होवून ती महाकाय वृक्षराजी जमीनीत खोलवर गाडली गेली. या प्रक्रियेमुळे पुढे त्या प्रचण्ड प्रमाणातील वृक्षांचे रुपांतार दगडी कोळश्यात झाले. या प्रचण्ड दगडी कोळशाचे साठे भूगर्भात नियतीने जणू मानवाच्या पुढील प्रगत अवस्थेत लागणाऱ्या उर्जेसाठी दूरदृष्टीने करुन ठेवले असे म्हणावे लागेल. एका दृष्टीने मानवाच्या पुढील भविष्यासाठी हे त्या वृक्षांचे सामूहिक आत्मसमर्पणच म्हणावे लागेल-मानवाच्या कल्याणासाठी, मानवी जीवन उज्ज्वलतेसाठी.

वृक्ष अनेक प्रकारचे असतात. कालौघात त्यांच्या अनेक प्रजाती नष्ट झाल्या असल्यातरी आजही विविध वृक्ष जगाचे पाठीवर अस्तित्वात आहेत. वृक्ष आधी का मानव आधी या प्रश्नाचे उतर काहीही असो वा हा प्रश्न चूक की बरोबर हा वाद असो आजमितीस तरी दोन्ही परस्परांशी निगडीत व अवलंबित आहेत. कसे ते पुढे पाहू. वृक्षांच्या असंख्य अनेकविध जाती असल्यातरी त्यांची जातीनिहाय राज्ये नाहीत हे सत्य.

वृक्षांच्या सर्व जाती सर्व भागात आढळत नाहीत. विशिष्ट जाती विशिष्ट भागातच / प्रदेशातच येतात, कारण तिथली /तेथील भौगोलिक परिस्थिती, हवामान इ. त्यांचे लागणीस व वाढीस पूर्णतः सुयोग्य असते. ही विशिष्ट हवामान स्थिती व भौगोलिक परिस्थिती, अन्यत्र नसल्याने तेथे या विशिष्ट जातीचे वृक्ष येऊ शकत नाहीत आणि या वैशिष्ट्यामुळे ते ते प्रदेश त्या त्या वृक्षांचे नांवे प्रसिद्ध होतात / ओळखले जातात. जसे कोकण, गोवा, केरळ, कर्नाटक इ. प्रदेश नारळ, ताडमाड, सुपारी, चंदन, आंबा, काजु यासाठी प्रसिद्ध आहेत ते त्या त्या जातीचे / प्रकारचे वृक्षांसाठी. काही प्रदेश निलगिरी, बांबू यासाठीही प्रसिद्ध आहेतच. वृक्ष अनेकविध प्रकारचे असले तरी ढोबळमानाने त्यांची वर्गवारी छाया वृक्ष व शोभावृक्ष तसेच फळझाड वा फळवृक्ष व पुष्पवृक्ष अशी करता येईल. इंग्रजीत ती शोई ट्री व शेडी ट्री अशी करतात. आणखीही काही प्रकारे वर्गीकरण करता येणे शक्य आहे, जसे औषधी वृक्ष, विषारी वृक्ष, सुगंधी वृक्ष, उंच वृक्ष, बुटके वृक्ष, पर्णवृक्ष, फळवृक्ष, पुष्पवृक्ष, कणखर वृक्ष इ. इ. वृक्ष आणि झाड हे तसे सर्व सामान्यांचे दृष्टिकोनातून समानार्थी शब्द पण वृक्ष हा शब्द तसा भारदस्त वाटणारा व सर्वसाधारण पणे मोठ्या आकाराचे झाडांकरता सर्वसामान्यतः वापरण्याचा प्रघात असलेला तरी झाड हा शब्दही त्यांचेसाठी प्रयोगी होतोच. ''तरु'' हे आणखी एक संबोधन, तेही पण असेच भारदस्त. नांव/संबोधन भारदस्त असो वा नसो त्याचा वृक्षाच्या सर्वांगी उपयुक्ततेत काही अडसर येत नाही. म्हणतात ना ''नांवात काय आहे''? गुणातच सर्व आहे. वृक्षांना या शब्दखेळाशी काही देणे घेणे नाही. कोणताही वृक्ष मानवाचा शत्रू नाही या उलट मानवच या अजातशत्रूंचे जीवावर / अस्तित्वावर उठला आहे.

पर्यावरणाचा समतोल राखणारे हे वृक्ष कोणत्याही अपेक्षेचे भान ठेवणारे, पण भरभरुन सर्वस्व देणारेच आहेत. वृक्ष त्यांचे अन्न जमीनीतून व श्वसन वातावरणातून घेतात/ करतात. जमीन व आकाश यांच्यात उभा असलेला व्रक्षदेह मात्र मानव व सर्व सजीवांसाठी उपयोगी पडतो.

संकटकाळी आपण नेहमी आसरा घेण्यासाठी ज्या घटकांकडे धाव घेतो अशा घटकांमध्ये वृक्षाचा पण अंतर्भाव आहे.

वृक्ष मानवाला अनेक प्रकारे उपयोगी पडतात. वृक्षांपासून पाने, फळे, फुले तर मिळतातच. पण त्याचे अंगप्रत्यंग जळाऊ सरपण ते घराच्या तुळ्या, चौकटी दरवाजे खिडक्यांच्या, त्यांची दारे, विविध फर्निचर, अनेक शोभिवंत वस्तू, पलंगादी शय्यासने, पाट, देव्हारे आदि आसने, कौलारु छपरांची आधारचौकट, खांब, विविध गृहोपयोगी वस्तू – पोळपाट, लाटणी, चमचे, बरण्या इ. इ. ते विविध मनोरंजनाची खेळणी, देवदेवतांच्या मूर्ती, विविध काष्ठशिल्पे, तसबिरींच्या चौकटी (फ्रेम्स), झोपाळे, झुले, बाके, ड्रॉईंग बोर्डस, पाट्या इ. ते अगदी म्हातारपणाच्या आधार

काठीपर्यंत असंख्य प्रकारे मानवाने वृक्षांचा जीवनात उपयोग केला आहे, करत आहे व करत राहील अव्याहतपणे. लहानपणच्या पांगुळगाड्यापासून तो थेट चितेपर्यंत वृक्ष मानवाला उपयोगी पडत साथ देत आहेत. वृक्षांचा उपयोग मानवाने विधायक ते विध्वसंक अशा सर्व कामाकरता केला आहे. संहारक/ विध्वंसक कामाकरता जरी त्यांचा मानवाने उपयोग केला तरी वृक्षांनी त्यास ना हरकत घेतली वा आंदोलन केले. निसर्ग व वृक्ष यांचे असेच आहे. निसर्गाच्या सर्व मोसमांशी, ऋतुमानाशी हे वृक्ष सतत तोंड देत, संघर्ष करत जगत असतात. निसर्गाचा प्रकोप झेलतात तसेच धरतीचाही. प्रसंगी ते यांत उन्मळून पडतात.

पुराचे लोंढे, भूकंप, विजेचा लोळ, जबरदस्त गतीचा वादळवारा, कडक ऊन, तीव्र थंडी, गारपीट, चक्रीवादळ इ. निसर्ग तांडव हे वृक्ष स्थितप्रज्ञ वृत्तीने सहन करतात. त्यांची अंगे जलधारांनी भिजतात. वादळवाऱ्यात त्यांचे अवयव-फांद्या तुटतात तर भूकंपात ते अख्खे गाडले जातात. संजीवन समाधी घेतात. विजेचा लोळ अंग जाळून खाक करतो तर महापूरात मूळासकट वाहून जाऊन ते स्थानभ्रष्ट होतात.

त्यांचे हे जीवन निसर्गाच्या कुशीत फुलत, बहरत व विलय पावत तसेच ते मानवाकडूनही याच चक्रातून जात. दोन विविध स्तरांशी हा त्याच जीवनसंघर्ष सुरु असतो, कधी कधी वादळी वाऱ्यात त्यांच्याच फांद्या एकमेकांवर घासून वणवा उत्पन्न होवून समस्त वृक्षसमूहच दग्ध होतो तसाच मानवही आग लावून त्यांचा विनाश करतात. वृक्ष त्यांचे जीवन या सर्वांतून जगतात व मानव इतर सजीवांचे जगवतात.

वृक्षांचा आपण आधार घेतो पावसापासून तसेच कडक उन्हापासून बचाव करण्यास आणि त्यांच्या फांद्यांचे दहन करुन शेकोटी पेटवून थंडीपासून बचाव करण्यात. त्यांचे बुंध्याभोवती पार बांधून आपण विश्रांती/ विसावा कट्टे निर्माण करतो तर त्यांचे फांद्यांना झोपाळे टांगून उंच झोके घेतो. वृक्षतळी विसावा, निद्रा घेतात पांथस्थ, तर त्यांचे बुंध्याशी कधी कधी छोटी देवळी बांधून वा त्यांचे खोडावर खिळे ठोकून त्यावर देवांचे फोटो टांगून तर देवळीत देवाची मूर्ती वा फोटो ठेवून श्रद्धा/पूजा यांचे स्थानही निर्माण करतो. अश्या तऱ्हेने काही लोक त्यांचा उदरनिर्वाह करतात. त्यांच्या खोडाचा आधार घेवून गरीब तात्पुरते निवारास्थान निर्मितात. काही जण वृक्षाखाली टपरीवजा दुकानेही थाटतात वा हातगाड्या अन्नपदार्थ/शीतपेये इ. लावून व्यापार करतात.

पुष्कळदा या वृक्षांचे खोडावर नामपाट्या, फलक, दिशादर्शक बाण खिळे ठोकून लावतात. शहरात काही वृक्षांवर इलेक्ट्रीक शोभेच्या दीपमाळाही लावून वा लाऊडस्पिकर लावून सण / उत्सवासाठी त्यांचा उपयोग करतात. काही प्रसंगी (निवडणूका इ.) त्यांचेवर पक्षांचे झेंडेही लावतात. त्यांचेखाली सभा वगैरेही कधी कधी घेतात, तर कधी कीर्तन इ. कार्यक्रमही होतात.

कधी त्याच्या बुंध्याभोवती फरशा घालून छोटेसे आंगणही केले जाते - काही वेळा त्याखाली सतरंजी, पोती टाकून छोटी अस्थायी दुकानेही दिवसा असतात.

मुले त्यांच्यावर चढून खेळ करतात तर कधी लपाछपी करतात. पूर्वी यांचा उपयोग हेरगिरीसाठीही केला जाई तसेच सैनिक त्यावर लपून बसून हल्ला करत काही प्रसंगी.

पांडवांनीही आपली शस्त्रे शमीवृक्षावर ठेवली होती लपवून-रामानेही हाच आडोसा करुन वालीवर बाण सोडून त्याचा वध केला. सीताही अशोकवृक्षाखालीच राहिली होती इ. अनेक कथानके पुराणात वृक्षांसी संबंधित आहेत.

रामरावण युद्धात तर वानरांनी वृक्ष उपटून राक्षसांवर हल्ला केला म्हणजे वृक्ष हे शस्त्र म्हणूनही वापरले जात त्यावेळी. मोठमोठे महाकाय वृक्ष उपटून त्यांचा शस्त्र म्हणून उपयोग करत असत.

वृक्षराजी/वने यांचा सुद्धा मानवाने स्वत:स रहाणे/निवासासाठी वृक्ष तोड व वृक्ष दहन करुन ती जागा वापरली आहे. खांडववन जाळून इंद्रप्रस्थ बसवले गेले ही गोष्ट महाभारतात आहे. आजही वृक्षांचे बुंध्यांना आग लावून ते निर्जीव करुन नंतर ती लाकडे विकली जातात.

एक ना अनेक प्रकारे वृक्ष मानवाने त्याच्या जीवनात वापरले आहेत व आजही वापरत आहे. भविष्याचे सांगता येणे कठीण कारण वनक्षेत्राची प्रचण्ड प्रमाणात झालेली हानी. वनक्षेत्र खूप कमी झाले आहे व अत्यंत चिंताजनक बाब आहे.

कसाही उपयोग केला मानवाने तरी वृक्षांनी कधी कसलीही तक्रार / नाराजी व्यक्त केली नाही. निःशब्दपणे अत्याचार सहन करणे तसेच परोपकाराचा कसलाही डंका न वाजविणे हा वेगळा वृक्षधर्म आहे. वृक्ष हे पाखरांचे आश्रयस्थान आहेत, तसेच काही सजीव प्राण्यांचेही. अनेक पक्षी आपली घरटी वृक्षांवर करतात तर काही सजीवप्राणी त्यांच्यावरच रहातात. शाखामृग (वानर, माकडे) खार इ. शिवाय अनेक छोटे मोठे प्राणी वृक्षांवर रहातात व ते वृक्षांची फळे, पाने, भक्षण करुन गुजराण करतात. काही पक्षी वृक्षफांद्यांवर घरटी करतात तर काही वृक्षास-खोडास भोक पाडून अंतर्यामी वस्ती करतात. सुतारपक्षी हे करतात. पोपटही झाडांचे /वृक्षांचे ढोलीत वस्ती करतात. अनेक कीटक सुद्धा वृक्षांवर जगतात रहातात. मधमाशंचीही पोळी वृक्षावर लटकत असतात हे आपण पहातोच. परस्परांचे शत्रू /मित्र दोघांनाही वृक्ष थारा देतात, समानतेने वागवतात. आपल्या अंगाखांद्यावर ''ते सर्वांही सदा सज्जने । सोयरे होतू ।।'' या पसायदानातील ओवीचे निसर्गाने दिलेले / साकारलेले प्रत्यक्ष प्रमाण होय. तटस्थपणे निर्विकारपणे राहण्याची ही वृत्ती हा महान गुण वृक्षांपासून शिकावा. सर्वांना आपले द्वार खुले ठेवतात हे वृक्ष. हाच गुण खरे संत सज्जन आचरणात आणतात. या अर्थाने वृक्ष हे जगन्मित्र आहेत. ''जगाच्या कल्याणा

संतांच्या विभूती । देह कष्टविती उपकारे ।।'' यासारखे वृक्षही जगाच्या कल्याणसाठी ''जिंदगी के साथ भी जिंदगी के बाद भी'' उपयोगी पडतात सर्व प्रकारे. राख झाली तरी राखही उपयोगी. इतके कल्याणकारी कार्य असते वृक्षांचे म्हणूनच ते खरे जगन्मित्र.

वृक्ष फळे व पाने यांची उत्पती, स्थिती व लय पाहणारे स्थितप्रज्ञ होत. चैत्रात येणारी नवी कोवळी हिरवी पालवी, फळाआधी येणारा मोहोर, फळे व शेवटी पक्व होवून पडणारी फळे व शिशिर ऋतुत पिवळी होवून झडणारी वा गळणारी पाने यांची कित्येक आवर्तने वृक्षास त्याचे हयातीत पहावी लागतात. हे पहाता पहाता पुढे तो वृक्ष वठतो. त्याचे जीवनमान संपते सर्व अवस्थामध्ये तो स्थितप्रज्ञ भगवद् गीतेतील श्लोक ''सुखदुःखे समत्कृत्वा'' सारखा. भगवतद्गीतेतील स्थितप्रज्ञावस्थेचे हे उदाहरण होय.

कधी वृक्षांच्या फांद्या तुटतात, तर कधी थोडासा भाग जळून जातो, तर कधी थोडा भाग / फांद्या मानवाकडून कापून टाकल्या जातात, ही सर्व चिन्हे वृक्ष अंगावर वागवतात व जगतात. सर्व वृक्षांचे आयुष्य सारखे नसते. तसेच एकाच जातीचे सर्व वृक्षही सारख्या आकाराचे नसतात जसे एकाच हाताची पांची बोटे सारखी नसतात, तसेच हे वृक्षांचे. वृक्षांचा शाखासंभार त्याचे विशालत्व विस्तार याची निशाणी असते. काही वृक्ष सरळसोट उभे चढतात तर काही डेरेदार असतात. वड हे त्यापैकी एक उदाहरण आहे. याच्या पारंब्या मुळाकडे येऊन रुजतात व नवे नवे बुंधे त्याच्याभोवती निर्माण होवून हा विराट रुपाचा होतो. ''मोठे झालो तरी मूळ विसरु नका'' असा संदेश जणू हा देत असतो. पिंपळ, चिंच, साग, आंबा यासारखी झाडे महाकाय होतात. सर्वच वृक्षांना शाखा सांभार नसतो. ताड, माड(नारळ) यासारखी झाडे सरळसोट तर कधी तिरपी, वेडीवाकडी परंतु विनशाखेची उत्तुंग वाढतात. त्यांच्या शेंड्याला पर्णसांभार व फळे येतात तर अशोकासारखे देवदार आदि वृक्ष निमुळते होत पण पर्णसंभारांनी भरुन वाढत जातात. मागे उल्लेखल्याप्रमाणे झाड ही संज्ञा केळी वगैरेंना वापरतात. त्यांना कोणी वृक्ष म्हणणार नाही. ही संज्ञा आपोआपच जनात रुढ होत जाते. वृक्ष व झाड कोठे वापरवावे हे शब्द याची निश्चित व्याख्या नाही. निदान मला तरी माहित नाही.

सागरी किनारा व त्यालगतच्या प्रदेशात नारळी पोफळींच्या बागा तसेच आंबा, काजू, फणस आदिंबरोबर पिंपळ, चिंच, वड, माड, काजरा, जांभूळ, करवंदे इ. चे वृक्ष (अनेक वृक्ष) येतात. ही सागरी दमट हवामानात वाढणारी वृक्षसंपदा. काही वृक्ष विषम हवामानात वाढतात. चंदनासारखे वृक्ष फार ठिकाणी येत नाहीत तर निलगीरीच्या जवळपास सहाशे जाती आहेत ज्या वेगवेगळ्या भौगोलिक व नैसर्गिक वातावरणात वाढतात. दलदलीच्या प्रदेशात वेगळ्या प्रकारचे वृक्ष येतात तर राजस्थानसारख्या वाळवंटी प्रदेशात व लेह लडाख सारख्या बर्फाळ प्रदेशात, हिमालयात वेगळ्या वृक्षांची वाढ होते. मी वनस्पतीशास्त्रज्ञ नाही त्यामुळे

प्रदेशनिहाय वृक्षांची यादी मला माहित नाही, क्षमस्व. अर्थात तो वेगळाच विषय आहे. त्यामुळे त्यास येथे विराम देतो. वृक्ष सगळ्या प्रदेशात येत असेल तरी त्यांची संख्या त्या त्या भौगालिक व निसर्गनिर्मित वातावरणानुसार कमी जास्त होऊ शकते. काही प्रदेशात तर मैलोनमैल अंतरावर एखादा / एखाद दुसरा वृक्ष आढळतो, तर काही प्रदेशात सूर्यप्रकाशही भूमीवर येणार नाही इतके घनदाट अरण्य वृक्षांचे असते. इतक्या प्रचंड प्रमाणात हे वृक्ष तेथे असतात. देवदार, साग, इ.ची अशी घनदाट जंगले मी पाहिली आहेत. निलगीरीचेही जंगल असते. वड, पिंपळ यासारखी वृक्ष प्रजाती सर्वत्र आढळते. असे काही वृक्ष सर्व तऱ्हेच्या वातावरणात वाढतात. भौगोलिक व नैसर्गिक वातावरणाप्रामणे यांची वाढ कमी जास्त होऊ श्कते तसाच आकारही मोठा, मध्यम व खुजा असू शकतो.

काही वृक्ष बाभळीसारखे काटेरी असतात. प्रत्येक जातीच्या वृक्षांची पाने अगदी भिन्न आकाराची असतात. काही वृक्षांची पाने खूप मोठी तर काहीची अगदी लहान असतात. आकार, लांबी, रुंदी भिन्न असते. केळीची पाने, नारळाच्या झावळ्या, सागाची पाने, आंब्याची पाने, बदामाची पाने, चिंचेची पाने, वडाची व पिंपळाची पाने इ. पहा किती वेगळी आहेत. पानांचे या वैशिष्ट्यामुळे केवळ पानावरुनही वृक्ष ओळखता येतात. वृक्षांची पर्णसंपदा मानवाला विविध प्रकारे उपयोगी पडते ते पुढे पाहू याच. दरवर्षी वृक्षांची पानगळ होते व नवीन पर्णसांभार निर्माण होतच असतो.

वृक्ष विविध प्रकारचे/जातीचे असल्याने त्यांचे उपयोग वेगवेळ्या प्रकारे मानवाने केले आहेत. सर्व वृक्षांचे औषधी उपयोगही आहेत. ''नास्ति सूलम अनौषधम'' या संस्कृत सुभाषितातील पंक्तीत हेच सांगितले आहे. आयुर्वेद हे औषधीशास्त्र याच वृक्षांचे औषधी गुणधर्मावर आधारित आहे. काही वृक्ष पुष्पवृक्ष म्हणूनच ओळखले जातात. बकुळ वृक्ष, प्राजक्त वृक्षसारखे वृक्ष हे फुलांनी डवरुन आले की आसमंतास सुगंधी करतात, तर गुलमोहोर, पळस आदि वृक्ष शोभायमान असा पुष्पसंभार धारण करुन वातावरण चित्रमय रंगमय करतात. रंगाची उधळण करणारी फुले व सुगंधांची उधळण करणारी फुले जशी हे वृक्ष देतात तशीच झिंग आणणारी मोहवृक्षाची फुलेही असतात.

वृक्षांच्या पानांचे द्रोण, पत्रावळी, आसने अद्यापही उपयोगात आहेत. वृक्ष फळे विविध रसगुणांनी युक्त असतात. विविध चवींची, रसांची, रंगांची फळे विविध उपयोगाची आहेत व त्यापासून आज काय काय पदार्थ, रस आपण करतो हे सर्वज्ञात आहेच त्यावर एक वेगळे प्रकरणच लिहावे लागेल. वृक्षांचे शरीरही विविध उपयोगी पडते. चंदनवृक्ष तर त्याचे शरीरी सुगंध असल्याने तोडले जातात, त्या अमोल शीतल, सुगंधी चंदनासाठी व चंदन तेलासाठी. सागासारखे वृक्ष हे तर उत्तम टिकाऊ इमारती लाकडासाठी प्रसिद्ध आहेत. शिसवी सारखे वृक्ष, सुंदर, कलात्मक तसेच

उत्तम टिकाऊ वस्तू करण्यासाठीचे लाकूड देतात ज्यापासून उत्तम दर्जेदार फर्निचर, विविध कलात्मक वस्तू तयार होतात. धावडा, खैर हे वृक्ष उत्तम जळाऊ सरपण देतात. यांचे लाकूड जसे उत्तम जळाऊ सरपण देते तसेच त्यापासून दर्जेदार कोळसाही तयार करतात. फणसाचे लाकूड भक्कम मजबूत असते बांधकामात वापरण्यास. अनेक प्रकारचे उपयोग किती प्रकारच्या वृक्षांचे आहेत हा छोट्या प्रबंधाचा विषय होईल. येथे एवढेच नमूद करतो की वृक्ष रासायनिक, औषधी, अन्न, सुगंधी द्रव्ये, तेल, रस, खत इ. देणारे एक समृद्ध भांडारच आहे निसर्गाचे.

वृक्ष हे सुद्धा आपणासारखेच रोगराईचे बळी ठरतात. बीरुड/वाळवी लागून मोठमोठे वृक्ष सुद्धा नाश पावतात. बांडगूळामुळेही मूळ वृक्ष क्षय पावतो. हे बांडगूळ म्हणजे एक दुसऱ्या जातीचा वृक्ष एखाद्या वेगळ्या जातीच्या वृक्षावर त्या मूळ वृक्षाचे शोषण करुन वाढतो परिणामी मूळ वृक्ष-वाढ खुंटते वा तो नष्ट होतो. मानवांमध्येही असे परोपजीवी लोक असतातच. काही वेळा एकापेक्षा अधिक बांडगुळे वाढतात. परावलंबित्वाने जगणारे हे वृक्ष-वृक्षजातीचेच शत्रू खाल्ल्या घरचे वासे मोजणारे. माणसेच माणसांची वैरी तसाच वृक्षच वृक्षवैरी हा प्रकार मानवी जीवनाशी साधर्म्य दाखवतो.

वृक्षांपासून जे लाकूड मिळते त्याचा एक उपयोग कुऱ्हाडीचा दांडा म्हणूनही होतो व हीच कुऱ्हाड वृक्षावर चालविली जाते. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ही म्हण यामुळे तर नाहीना आली? वृक्षांच्या लाकडांचा शस्त्रांमध्येही उपयोग होतो. रायफलचा दस्ता, गुप्ती, बाण, धनुष्य इ. कधी कधी याच वृक्षांच्या फांद्याचा उपयोग माणसे आत्महत्येसाठी तर कधी कोणास फाशी देण्यासाठीही करतात. तर त्यांच्या बुंध्यात असलेल्या ढोलीचा उपयोग कधी लपण्यासाठी (मोठी असल्यास) तर कधी चोरवस्तू लपविण्यासही होतो. कोणी कसाही उपयोग केला तरी वृक्ष त्यास कधीही हरकत घेतात का? सर्वस्व अर्पणारे कसलीही कधीही चौकशी न करता हे वृक्ष खरे दानशूर.

वृक्ष हे पक्षांचे आश्रयस्थान असल्यामुळे पक्षांच्या कलकलाटापासून ते त्यांच्या सुरेलतानांचे सर्व संगीत हे ऐकतात. वृक्षांचा आणखी एक उपयाोग म्हणजे त्यांचा संगीत व तालवाद्यांसाठी. तंबोरा, संवादिनी, सतार इ. वाद्ये करायला (सूरवाद्ये) वृक्ष उपयोगी पडतात. वृक्षांच्या पानांच्या पिपाण्या करुन त्या वाजविताना मुलांना आपण पहातोच. तसेच ढोल ताश्यासाठी ते वाजविण्याच्या काठ्या ही करतात. संगीत विश्वातही वृक्षांचे योगदान आहेच. त्यांच्या बिया, पाने इ. चा उपयोग करुन काही चित्रे व कलाकृती तयार करतात.

वृक्ष दिवसा हवेतील कार्बनडाय् ऑक्साइड शोषून प्राणवायू सोडतात तर रात्री याउलट क्रिया त्यामुळे वृक्षातळी रात्री झोपलेल्यांना मृत्यु येतो असे म्हणतात. वृक्षाची सावली (डेरेदार वृक्षांची) मानवास व इतर सजीवांना उन्हापासून संरक्षण देते म्हणूनच कडक उन्हाळ्यात वृक्षातळी पांथस्थ व जनावरे विश्रांती घेतात तसेच पावसातही संरक्षणासाठी

यांचा आश्रय घेतला जातो. वृक्ष वादळवारे, ऊन, थंडी पाऊस सर्व सोसतात. वृक्षांचा आश्रय तपस्वी लोकसुद्धा घेतात त्यांचे तळी बसून तपश्चर्या करतात. खेड्यात तर शाळा सुद्धा वृक्षतळी भरतात. वृक्ष सावलीचे छत्र ही त्यांची सजीवांवर मायाच म्हणावी लागेल. पक्षांचा संसारच वृक्षांवर होते. त्यांच्या अंगाखांद्यावर हे पक्षी बागडतात. एका कवितेची ओळ ''पाखरांची शाळा भरे पिंपळावरती'' येथे आठवते. तसेच आणखी एका कवितेतील ओळ ''गांवसीमेच्या वृक्ष सावलीस, बसे कोणी पांथस्थ विसाव्यास'' ही पण आठवते. अशी अनेक प्रत्ययकारी काव्ये / कविता आहेत वृक्षांसबंधी.

काही वेलीसुद्धा या वृक्षांच्या आधाराने वृक्षावर चढतात व वृक्षात लपेटलास त्यांचीही शोभा वेगळीच. त्यामुळे वृक्षरुपही कधी कधी मोहक वाटते. कोकणात तर पावसाळ्या आधी असंख्य काजव्यांनी हे वृक्ष रात्रभर चमकतात. तर काही वृक्षांचे लाकूड रात्री स्वयंप्रकाशी असल्याने चमकते. जंगलात तर रातकीडे रात्रभर आवाज काढतात वृक्षांवर वस्ती करून.

वृक्षांचे महत्व संतांनीही जाणले होते. प्राचीन काळी तपस्वी ऋषी-मुनी घनदाट जंगलात आश्रम उभारुन वास्तव्य करीत. त्यांना ''तपोवन'' म्हणत. आपल्या संस्कृतीतही ''वानप्रस्थाश्रम'' सांगितला आहे वयाचे ५० ते ७५ वर्षे कालावधीसाठी ज्यात अरण्यात वास करुन राहण्याचा संदेश आहे पुराणात तसेच महाभारतात काही त्यावेळची महावने उल्लेखलेली आहेत ज्यात श्रीकृष्णांनी, पांडवांनी व अन्य महात्मे, संत, तपस्वी यांनी वास्तव्य केले होते. ही महावने राजे महाराजे वन्यप्राणीशिकारीसाठी वापरत, तसेच वनविहारासाठी. स्वच्छ सूर्यप्रकाश, नैसर्गिक कंदमुळे, फळफळावळे, शुद्ध हवा, पाणी निर्झरांचे झुळझुळ वाहणारे प्रवाह, पशुपक्षांचे आवाज इ. मुळे मन तन प्रसन्न ताजेतवाने होत असे. वृक्षांची अमाप संख्या असलेली ही वने मानवाला वरदान होती. श्रीमद्भगवद्गीतेतील अध्याय १२ तला श्लोक १८ असा :-

''समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः।
शीतोष्णसुखदुःखेषु समः सङ्गविवर्जितः।।''

अर्थ : ''जो शत्रु-मित्र आणि मान-अपमान यांविषयी समभाव बाळगतो, तसेच थंडी-ऊन, सुखःदुःख इत्यादि द्वंदात ज्याची वृत्ती सारखीच रहाते'' असा स्थिर बुद्धीचा भक्तिमान परमेश्वराला (श्रीकृष्णाला) प्रिय असतो. यावरील भाष्यात ज्ञानेश्वरीत अ. १२, ओवी ९९ अशी आहेः- जो खांडावया घावो घाली। कां लावणी जयाने केली ।

दोघा एकचि साउली । वृक्षु दे जैसा ।।''
म्हणजे आपणास तोडण्यासाठी घाव घालण्याऱ्यास तसेच आपली लागवड करणाऱ्यास दोघांनाही वृक्ष/झाड सारखीच सावली देते.

(लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकात...)

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

जगद्गुरु आदिशंकराचार्य यांनी सर्व वेदविद्येचे सार, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या।' या एकाच सूत्रात सांगितले आहे. या ब्रह्मांडांतील सर्व चराचराच्या निर्मितीला कारण असे एकच ब्रह्मतत्त्व आहे की जे अनाद्यन्त, सनातन असे चिर-सत्य आहे. हे एकच सत्य असे आहे की त्याच्या उद्‌भवाला दुसरे कोणतेही कारण नसून तेच सर्व चराचरांच्या उद्‌भवाचे कारण आहे. (causeless cause) त्याला वस्तुमानाचे गूण नसल्यामुळे ते 'अगोचर' म्हणजे इन्द्रियांनी जाणण्यासारखे नाही. ते कल्पनातीत व शब्दातीत आहे. पण तरीसुद्धा तेच एक निरंतर अव्यय असे 'सत्य' आहे. त्याच्या अस्तित्त्वाचा अनुभव आपण केवळ त्याने निर्माण केलेल्या विश्वामधून, त्याने निर्माण केलेल्या प्रकृतीच्या चमत्कृतीजन्य कार्यप्रणालीमधूनच घेऊ शकतो. सर्व विश्वाला व त्यांतील चराचराला चैतन्यरुपाने ते तत्त्व व्यापून राहिले आहे. 'विश्वारुपचि विष्णु हा विश्व व्यापुनी राहिला। हे सर्व ब्रह्मांड* 'सर्ग' प्रक्रियेत या शून्यरूप ब्रह्मतत्त्वातून निर्माण होते, विकसित होत जाते व 'प्रलय'-प्रक्रियेत ते सर्व पुन्हा शून्यात विलीन होऊन जाते (नाहिसे होते). अशा या ब्रह्मतत्त्वाला वेदविद्येत ॐ या बीजाक्षराने संबोधिले आहे व त्या बीजाक्षराचे सगुण रुप जो गणपती त्याला गणपत्यथर्वशीर्षांत 'महोदर गिळे पापां प्रलयीं विश्वही गिळे' म्हणून 'लम्बोदर' या नावाने संबोधिले आहे.

वरील सूत्रात जगाला मिथ्या म्हटले आहे ते ब्रह्माच्या सापेक्ष (तुलनेत) म्हटले आहे. केवळ शंभर वर्षे आयुष्य लाभलेल्या मानवाच्या तुलनेत हे जग नित्य निरंतरच मानावयास लागेल. सूर्याच्या आत्मयज्ञात दर क्षणाला त्याचे वस्तुमान कमी होत आहे. आधुनिक भौतिक शास्त्रज्ञांनी तर त्याचे आयुष्यही गणिताने सिद्ध केले आहे. पण ते कित्येक अब्ज-खर्व वर्षांचे असल्यामुळे, मानवी इतिहासाच्या संदर्भात सूर्याला व्यावहारिक दृष्ट्या निरंतर किंवा नित्यच मानणे योग्य ठरेल. 'यावच्चंद्रदिवाकरौ' हा वाक्प्रचार हेच दर्शवितो.

संसाराला कंटाळून संसाराचाच त्याग करून समाजापासून दूर अशा अरण्यात जाऊन रहाणाऱ्या तपस्व्यांनी आपल्या मार्गाच्या समर्थनार्थ 'जगन्मिथ्या' या शब्दांचा विपरित अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. पण हे कसे चूक (विपरित) होते हे, 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या' हे सूक्ष्म सांगणाऱ्या आद्य शंकराचार्यांच्याच समाजबोधनाच्या आणि धर्मप्रसाराच्या कार्याचा आढावा घेतल्यास लक्षात येईल. शंकराचार्यांनी आपल्या साधनेसाठी ब्रह्मचर्यव्रत पाळले म्हणजे

* ज्याला आपण जग म्हणतो ती पृथ्वी, या अथांग ब्रह्मांडात, समुद्रकिनाऱ्यावर पसरलेलया वाळूंतील एका कणाप्रमाणे आहे असे विज्ञान महर्षी न्युटनने म्हटले आहे.

स्वतःच्या संसाराचा त्याग केला, पण समाजाच्या संसाराला सांभाळण्यासाठी, समाजबोधन करून धर्मप्रसार करण्यासाठी आपले सर्व आयुष्य वेचले. सर्व भारताचा पायी प्रवास करून वैदिक धर्माचा प्रसार करून बौद्ध विचारांची लाट थोपविली व सर्व भारतीयांमध्ये (त्यावेळी भारतांत निरनिराळी अनेक राज्ये असली तरी) अखंड भारतीयत्वाची राष्ट्रीय भावना प्रस्थापित केली. एखाद्या सन्यस्तवृत्तीच्या माणसाला स्वतःसाठी असे काहीच मिळवावयाचे नसले, तरी त्याने लोकसंग्रहाचे कार्य सोडू नये असेच वेदविद्या सांगते. गीतेच्या ३ऱ्या अध्यायात प्रत्यक्ष भगवन्त स्वतःविषयी हेच सांगतात.

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किञ्चन।
नानवाप्रमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि।।२२।।

मराठीत –

नसे कर्तव्य मजसि तिन्ही लोकांत अल्पही।
काही ना मिळवायाचे, करी कर्म तरीही मी।।२२।।

वेदान्त तत्त्वज्ञान उलगडून दाखविणारी बरीचशी उपनिषदे ही निवृत्तीपर असल्याचा भास होतो, परंतु वेदविद्या ही प्रवृत्तीपरच आहे, हे ईशोपनिषद् कठोपनिषद इत्यादी काही उपनिषदांवरुन स्पष्ट होते. माणसाने निवृत्त (निःस्वार्थी) मनाने प्रवृत्त (कार्यप्रवण) रहावे असेच सर्व उपनिषदांचे थोडक्यात सार सांगता येईल.

वेदविद्येत मनुष्य जन्म लाभलेल्या व्यक्तीसाठी, धर्म अर्थ, काम आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. प्रत्येक मानवाचे मोक्ष म्हणजेच ब्रह्मप्राप्ती हेच अंतिम ध्येय असले पाहिजे. पहिले तीन पुरुषार्थ सांभाळूनच माणसाला मोक्ष मार्गावर प्रगती करावयाची असते. हा चवथा पुरुषार्थ मिळविण्यासाठी मात्र माणसाला त्याच्या पूर्वतयारीनुसार अनेक जन्म घ्यावे लागतात. गीतेच्या सहाव्या अध्यायात भगवन्त सांगतात

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः।
अनेकजन्मसंसिद्धो ततो याति परां गतिम्।।४५।।

मराठीत :

पापमुक्त असा योगी सर्वथा साधना करी।
अनेक जन्मयत्नें तो मिळवी परमा गती।।४५।।

माणसाने मुक्तीचा कोणताही योगमार्ग आचरला तरी त्याला त्यासाठी कर्म करण्यावाचून दुसरा पर्याय नाही.

सामान्य प्रापंचिकालाही संसारातील नित्य नियत कर्मे कर्मयोगाच्या युक्तीने करून परमार्थ साधण्याची युक्ती म्हणजेच राजविद्या (राजगुह्ययोग) भगवन्ताने गीतेच्या ९ व्या अध्यायात विशद केली आहे.

आत्मा नित्य आणि अविनाशी आहे. पण तो ज्या देहाचा आश्रय घेतो तो देह मात्र नश्वर म्हणजे विनाशी आहे, असे वेदविद्या सांगते. आत्म्याच्या तुलनेत देह हा दुय्यम किंवा कनिष्ट, कमी महत्त्वाचा दाखविला असला तरी माणसाच्या नश्वर जीवनाच्या संदर्भात मात्र (देह) शरीर हे फार महत्त्वाचे ठरते. आत्म्याला ब्रह्मप्राप्तीच्या मार्गावर प्रगती

करण्यासाठी हा इहलोक म्हणजे कर्मभूमी आहे व शरीर हे त्यासाठी कर्म करण्याचे मुख्य साधन आहे.

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्। हे कवी कालिदासाचे वचन प्रसिद्ध आहे.

थोडक्यात वेदविद्येत सांगितलेल्या कोणत्याही उपासनामार्गाचा अवलंब करण्यासाठी 'कर्म' हे अनिवार्य आहे व ते कर्म व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सुदृढ व निरामय शरीरही तितकेच अनिवार्य आहे. म्हणून वेदविद्येत मनःशान्ती मिळविण्याच्या मार्गावरील प्रवासात अत्यंत आवश्यक व सहाय्यक असणाऱ्या निरामय शरीराचाही विचार केला गेला आहे.

मन व शरीर ही जुळ्या भावंडाप्रमाणे एकमेकाशी जोडली गेल्याप्रमाणे आहेत. यापैकी कोणत्याही एकात विकृती झाल्यास त्याचा दुसऱ्यावर परिणाम झाल्याशिवाय रहात नाही. सतत मानसिक ताणामुळे किंवा आत्यंतिक संतापामुळे रक्तदाब वाढतो व त्यामुळे पुढील हृदयविषयक रोगांना निमंत्रण जाते. भय किंवा काळजीमुळे निद्रा नाश होतो व त्यामुळे शरीरात अनेक विकृती निर्माण होण्याचा धोका उत्पन्न होतो. दुसऱ्याबद्दल वाटणाऱ्या हेवा व आकसापोटी होणाऱ्या मनाच्या अस्वस्थपणामुळे शरीराच्या पचन क्रियेत बिघाड होऊन आम्लपित्तासारख्या व्याधी निर्माण होतात. त्याचप्रमाणे शरीरात कोठे दुखत खुपत असेल तर वेदविद्येत सांगितलेल्या कोणत्याही उपासनेसाठी लागणारी मनाची एकाग्रता होऊ शकत नाही. म्हणून शरीर स्वास्थ्याचा विचार करताना मनःस्वास्थ्याचाही समांतररीतीने विचार करावा लागतो.

निरामय शरीर म्हणजचे शरीरस्वास्थ्य (Healthy Body) प्राप्त करण्यासाठी काय पथ्ये सांभाळावी लागतात याची चतुःसूत्रीच भगवन्ताने गीतेच्या ६ व्या अध्यायात सांगितली आहे.

युक्ताहार विहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु।<br>
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा।।१७।।

मराठीत :

बेताचे फिरणे, खाणे कार्य निद्राहि माफक।<br>
मोजके जागणे ज्याचे, त्यास योग सुखावह। ।१७।।

१) युक्त आहार : आहाराची युक्तता त्रिविधा असली पाहिजे. कारण आहाराच्या युक्ततेचे तीन पैलू आहेत.

अ) आहार हा पर्यावरण, प्रदेशाचे हवामान व काळाचे ऋतुमान यांना अनुरुप असावयास हवा. भारतासारख्या उष्ण कटिबंधात असलेल्या देशात जो आहार आरोग्यदायक असेल तोच आहार नॉर्वेसारख्या शीतकटिबंधात असलेल्या देशात योग्य होणार नाही. एकाच प्रदेशातसुद्धा भिन्न ऋतूंत आहारात काही बदल करणे आवश्यक असते.

ब) आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे माणसाच्या कफ-प्रधान, पित्त-प्रधान व वात-प्रधान अशा तीन प्रकारच्या स्वाभाविक प्रकृती असू शकतात व त्याप्रमाणे सुद्धा आहारांतील निरनिराळ्या घटकांचे प्रमाण कमी जास्त करणे योग्य ठरते.

क) प्रत्येक माणसाची अन्न खाण्याची क्षमता ठराविक असते. त्या प्रमाणातच अन्नाचा ऐवज (Quantity) असणे आवश्यक असते. त्याक्षमतेपेक्षा जास्त जेवण झाल्यास ते अत्यशन होते. त्यामुळे सुस्ती येते व मनाची एकाग्रता होऊ शकत नाही. त्याहीपेक्षा जास्त जेवल्यास पोटास तिडीक लागते आणि अपचनाचे विकार होतात. म्हणून दोन घास कमी जेवावे असा पारंपारिक उपदेश आहे. या उलट क्षमतेपेक्षा खूपच कमी जेवल्यास भूक अतृप्त राहाते व त्यामुळेही मनाची एकाग्रता बिघडू शकते व शरीराची थोडीशी उपासमारही होते.

२) युक्त-विकार : योग्य आहार घेतल्यानंतर ते अन्न पचविण्यासाठी शरीराचे योग्य प्रमाणात चलन-वळन व व्यायामही आवश्यक असतो.

३) युक्त (चेष्टा) दिनचर्या : माणसाच्या पेशाप्रमाणे होणाऱ्या दिनचर्येत योग्य त्या प्रमाणात शारीरिक श्रम झाले पाहिजेत. जे बैठे काम करतात त्यांनी मुद्दाम चालण्याचा किंवा दुसरा कुठलाही पूरक व्यायाम घेतला पाहिजे व ज्यांच्या दिनचर्येत कष्टाचे शारीरिक काम असते, त्यांनी योग्य ती पूरक विश्रांतीही घेतली पाहिजे.

४) युक्त निद्रा-जागृतीचे प्रमाण : प्रत्येक माणसाला वयोमानाप्रमाणे व त्याच्या प्रकृतीप्रमाणे काही ठराविक तासांच्या (६ ते १०) झोपेची आवश्यकता असते. तेवढीच झोप माणसाने घ्यावी. दिवसा झोपू नये व रात्री उशीरापर्यंत जाग्रणही करू नये. दोन्हीही गोष्टी शरीर स्वास्थ्याला घातकच असतात. रात्री लवकर झोपी जाऊन सूर्योदयापूर्वी भल्या पहाटे उठावे, शौचमुखमार्जनादि प्रातःकर्मे उरकून आसन प्राणायामादी व थोडासा व्यायाम करून झाल्यावर सुखासनात बसून ईश्वर स्मरण करावे व आपल्या आदल्या दिवशीच्या कार्याचा आढावा घेऊन आत्मपरीक्षण करून येणाऱ्या दिवसाच्या कार्याची योजना आखावी. अशी वैदिक परंपरा आहे.

काही लोक उपासनेचा भाग म्हणून कडकडित उपोषण करतात (काहीतर निर्जली उपवास करतात) व शरीराला कष्ट देतात. पण असे केल्याने परमेश्वरावर मन एकाग्र करून त्याच्या जवळ वास करण्यात (म्हणजेच खऱ्या अर्थाने उपवास करण्यात) मोठाच अडथळा निर्माण होतो, हे त्यांना कळत नाही. तर काही लोक आम्ही मोठे धार्मिक आहोत हे दाखविण्यासाठी उपवासाचा देखावा करून आपल्या आवडीचे उपवासाचे म्हणून अनेक पदार्थ बनवून 'दुप्पट खाशी' करतात. हे दोन्हीही प्रकार योगसाधनेला पोषक नाहीत. गीतेच्या ६व्या अध्यायात भगवन्त सांगतात-

नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकान्तमनश्नतः।
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन।।१६।।

मराठीत :

खूप खाणे न खाणे वा आळसें अति झोप ती।
जागणे अति रात्रींही गोष्टी योगास बाधती।।१६।।

शरीर स्वास्थ्याला विघातक अशी दुसरी गोष्ट म्हणजे इन्द्रियांचे विषयलोलुपत्व.

परमेश्वराने मानवाला पंच ज्ञानेन्द्रियांबरोबर

मन व अचाट बुद्धिसामर्थ्य दिल्यामुळेच मानव भौतिक क्षेत्रात अद्‌भुत प्रगती करू शकला आहे. याच इन्द्रियांच्या सहाय्याने मनुष्य निरनिराळे सुखोपभोग घेऊ शकतो. परंतु ही इन्द्रिये त्यांच्या विषयांकडे आकर्षित होऊन त्यांच्याकडे स्वैर धावत सुटतात. त्यांच्यावरचा मनाचा ताबा सुटला तर मनुष्य विषयांचा दास होऊन व्यसनाधीन होतो. चिखलात अडकलेला मनुष्य चिखलांतून बाहेर पडण्याचा जेवढा प्रयत्न करतो तेवढा तेवढा तो चिखलात जास्तच रुतत जातो. त्याचप्रमाणे मनुष्य व्यसनाबाहेर पडण्याचा जेवढा जेवढा प्रयत्न करतो तेवढा तेवढाच तो त्या व्यसनांत जास्त बुडून जात असतो व आपल्या शरीराचा घात करून घेत असतो. इन्द्रिये विषयांमागे सुसाट धावत सुटली असताना त्यांच्यावर मनाचे नियंत्रण न रहाता तेही इन्द्रियांबरोबर स्वैर झाले व त्याच्यावरचा बुद्धीचा ताबाही सुटला तर मनुष्य अंतिम नाशाप्रत कसा जातो, या प्रक्रियेचा कार्य-कारण अनुक्रम गीतेंत २ ऱ्या अध्यायात उत्तम रीतीने वर्णन केला आहे.

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।
संगात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोह्वऽभिजायते ।।६२।।

क्रोधत्भवति संम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।६३।।

मराठीत :
विषयीं ध्यास होताची उद्‌भवे पार्थ संग तो।
उद्‌भवे कामसंगाने, कामापासून क्रोध तो।।६२।।

क्रोधाने होय सम्मोह संम्मोहाने स्मृतीभ्रम।
बुद्धिनाश भ्रमाने तो अंती जो सर्वनाशक।।६३।।

शरीराला होणाऱ्या बहुसंख्य व्याधी ह्या कोणत्यातरी शरीरास घातक असलेल्या गोष्टींच्या सेवनाने अथवा शरीरास पोषक असलेल्या गोष्टींच्याही सेवनाचा अतिरेक केल्यामुळे होतात असे दिसून येईल. तंबाखू सेवनाने कर्करोग होण्याची शक्यता वाढते तर मद्यसेवनाने यकृताचे रोग होतात. दररोजचा माफक आहार हा शरीराला आवश्यक व पुष्टीकारक असतो. पण पोटभर जेवण झाल्यावरही केवळ जिव्हालालनार्थ मनाचा तोल सुटून अतिभोजन केल्यास पोटशूळ होऊन जठराचे विकार होऊ शकतात. निरनिराळ्या विषय भोगांपासून मिळणाऱ्या भौतिक सुखांमध्ये कामसुख हे प्रथम क्रमांकाचे सुख आहे असे म्हणता येईल. पण तेच सुख वाममार्गाने मिळविण्याचा प्रयत्न केल्यास ते गुह्यरोगांना आमंत्रण होऊ शकते. सत्ताधारी राजेरजवाड्यांच्या स्त्री लालसेपोटी महायुद्धे घडून हजारो लोकांचे बळी गेल्याची उदाहरणे इतिहासात घडलेली दिसतात. थोडक्यात परमेश्वराने माणसाला बहाल केलेल्या इन्द्रियांच्या विषय भोगापासून माणसाला विशुद्ध सुख मिळू शकते, पण केव्हा? जेव्हा आसक्ती आणि द्वेष विरहित मनाचे इन्द्रियांवर पूर्ण नियंत्रण असेल म्हणजे आपण इन्द्रियांचे दास न हाता इन्द्रियांना आपण पूर्णपणे वश केले असेल (नियंत्रित ठेवले असेल) तेव्हाच याच आशयाचा गीतेतील २ ऱ्या अध्यायातील ६४ वा श्लोक असा आहे.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति।।६४।।

मराठीत

प्रीति-द्वेषविना किन्तु करी विषयभोग जो।
इन्द्रिये वश ठेऊनी, सदा चित्त प्रसन्न तो।।६४।।

हाच भावार्थ आणखी स्पष्ट करणारे रथ व रथारुढ वीर यांचे एक सुंदर रुपक कठोपनिषदात यमाच्या तोंडी घातले आहे.

आत्मानं रथिनं विद्धि, शरीरं रथमेव तु।
बुद्धिं तु सारथिं विद्धि, मनः प्रग्रहमेव च।।३।।

इन्द्रियाणि ह्ययानाहुर्विषयांस्तेषु गोचरान्।
आत्मेन्द्रियमनोयुक्तं भेक्तेत्याहुर्मनीषिणः।।४।।

मराठीत :

आत्मा जणू रथी वीर बसे देह-रथामधे।
मनाच्याच लगामाने बुद्धी सारथ्य चि करे।।३।।

इन्द्रिये-अश्व आकृष्ट विषयीं, रथभरकटे।
मनग्रहें परी बुद्धी रथ मार्गींच राखते।।४।।

शरीर-स्वास्थ्यासाठी शरीर निरोगी रहाणे ही प्राथमिक गरज आहे आणि शरीराला होणारे रोग बव्हंशी बुद्धीचा मनावरील व मनाचा इन्द्रियांवरील ताबा (नियंत्रण) सुटल्यामुळेच होतात. म्हणून वेदविद्येत मनोनिग्रहाचे महत्त्व सांगून तो मिळविण्यासाठी योग साधनाही सांगितल्या आहेत. पतञ्जली प्रणीत अष्टांग योगशास्त्राचे पहिलेच सूत्र 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः। असे आहे. अष्टांग योगाच्या यम, नियम, आसन, प्राणायाम या पहिल्या चार पायऱ्या शरीरस्वास्थ्याशीच निगडित आहेत. कारण शरीरस्वास्थ्य ही पुढील योगसाधनेसाठी प्राथमिक गरज आहे.

शरीरस्वास्थ्य टिकवण्याच्या प्रयत्नांचे दोन भाग आहेत.

इन्द्रियनियमन करून विषयांचे दास न होणे व प्रादेशिक पर्यावरण व ऋतुमानाप्रमाणे अनुकुल असा आहार विहार ठेवणे आणि आपल्या तेशाच्या कार्यप्रणालीनुसार निद्रा जागृतीचा समतोल राखणे हा पहिला भाग झाला. परंतु काही कारणामुळे रोगाचा उद्‌भव झाल्यास त्यावर औषधोपचार पथ्यपाणी करून लवकरात लवकर शरीराला रोगमुक्त करणे हा शरीरस्वास्थ्य टिकवण्याच्या प्रयत्नांचा दुसरा महत्त्वाचा भाग आहे. पहिल्या भागांतील प्रयत्नात काही त्रुटी पडल्यास ज्याप्रमाणे रोग होऊ शकतो. त्याचप्रमाणे अशा काही त्रुटी नसतानासुद्धा माणसाला त्याच्या प्रारब्ध परिणामी काही (अधिदैविक) रोग होऊ शकतात. रोगांप्रमाणे बाह्यात्कारी दुखापतीमुळेही शरीर स्वास्थ्य बिघडू शकते. अपघातामुळे किंवा वैऱ्याने केलेल्या हल्ल्यामुळेही अशा दुखापती होऊ शकतात. अशा आपत्तीत माणसाला वैद्यकीय मदत घेणे अवश्य होते व त्यासाठी वैदिक परंपरेत आयुर्वेद शास्त्र निर्माण झाले. अगदी प्राचीन काळात (उपनिषत्कालात) वैदिक वाङ्‌मयाला पूरक अशी सांख्य-पातञ्जलादी षड्‌दर्शने, उपनिषदांना समांतर रीतीने जशी निर्माण झाली, त्याचप्रमाणे आयुर्वेद व ज्योतिष (खगोलविज्ञानासहित) ही दोन शास्त्रेही निर्माण होऊन विकास पावत गेली. मानवी जीवनाला व्यावहारिक दृष्टीने

ही शास्त्रे अधिक महत्त्वाची ठरत असल्यामुळे या दोन्ही शास्त्रांना (त्यांचा वैदिक वाङ्मयात समावेश होत नसला तरी) 'उपवेद' (किंवा वेदांची उपांगे) अशी संज्ञा प्राप्त झाली.

वेदविद्येत सांगितलेले चारही पुरुषार्थ प्राप्त करण्यासाठी, आवश्यक असलेली योगसाधना-उपासनादीक कर्मे, त्याचप्रमाणे प्रपंचांतील सांसारिक नित्य-नेमित कर्मे पार पाडण्यासाठी मनुष्याला सुदृढ, सशक्त आणि निरामय शरीराची अत्यंत आवश्यकता आहे, हे तत्त्व वेद-वाङ्मयात आणि उपवाङ्मयात ठिकठिकाणी प्रतिपादित केल्याचे प्रकर्षाने जाणवते.

सर्व पारंपारिक पूजाविधींच्या मंगला चरणात आणि नित्यनैमित्तिक पाठांत म्हटले जाणारे दोन श्लोक प्रसिद्धच आहे.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्।।

अपुत्राः पुत्रिणाः सन्तु पुत्रिणाःसन्तु पौत्रिणाः।।
अधनाः सधनाः सन्तु जीवन्तु शरदां शतम्।।

माणसाला सर्व इच्छित शुभ गोष्टी प्राप्त झाल्या तरी जर त्याला शारीरिक वेदना होत असतील, तर तो सुखाचा खरा आनंद मिळवू शकत नाही. कोणत्याही ऐश्वर्य उपभोगाचा विशुद्ध आनंद अनुभवण्यासाठी वेदना विरहित, निरोगी शरीराची पार्श्वभूमी अत्यंत आवश्यक असते आणि म्हणूनच 'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु' च्या पाठोपाठ 'सर्वे सन्तु निरामयाः' असेही म्हटले आहे. अशा ऐश्वर्य सुखाचे आयुष्य भोगताना सर्व लोक शंभर वर्षे जगोत अशी प्रार्थना दुसऱ्या श्लोकाच्या शेवटी केली आहे.

अथर्ववेदान्तर्गत सर्व उपनिषदांच्या आरंभाचा शांतिपाठाचा पहिला श्लोक असा आहे.

ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः।
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः।।
स्थिरैरङ्गैस्तुष्टवाँसस्तनूभिर्व्यशेम देवहितं दयायुः।।

अर्थ -

' हे देवांनो, आम्ही भगवन्तासाठी यजन करताना, त्याची आराधना करताना, कल्याणप्रद व शुभप्रद वाणीच आमच्या कानांवर पडो, आमच्या नेत्रांना शुभप्रद असेच दृष्टीस पडो. <u>सुदृढ अवयव व शरीर</u> असणाऱ्या आम्हालां भगवंताची स्तुती करीत करीत परमात्म्याच्या उपयोगास येईल (परमार्थिक प्रगती करता करता) असेच आयुष्य लाभो, अशी प्रार्थना या पहिल्या श्लोकांत केली आहे. या पहिल्या शांतिपाठातही कल्याणप्रद आणि शुभप्रद गोष्टी मागतानाही सुदृढ आणि निरामय शरीराची मागणी कटाक्षाने केली आहे. पारंपारिक पूजाविधीतही प्राथमिक मंगला चरणात हा शांतिपाठ म्हणण्याची प्रथा आहे.

सर्व उपनिषदांच्या शिरोभागी मानल्या गेलेल्या ईशावास्योपनिषदातील पहिल्या दोन ऋचा अशा आहेत.

ईशावास्यमिदं सर्वं यत्किंञ्च जगत्यां जगत्।
तेन त्यक्तेन भुञ्जीथाः मा ग्रथः कस्य स्विद् धनम्।।१।।

कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेच्छतं समाः।
एवं त्वयि नान्यथेतोऽस्ति न कर्म विप्यते नरे।।२।।

ईशोपनिषद् म्हणतेः ''हे सर्व विश्व ईश निर्मित असून या विश्वातील सर्व चराचराला तो ईश्वर व्यापून राहिला आहे आणि त्या सर्व गोष्टींचा मालकही तोच आहे, अशी जाण मनात ठेऊन, दुसऱ्याकडे दिसणाऱ्या आकर्षक गोष्टींचा हव्यास धरु नये व त्या लुबाडून घेण्याचा प्रयत्नही करू नये. आपल्याला (ईशकृपेने) जे मिळाले आहे त्यातले शक्य असेल तेवढे दुसऱ्या गरजवंताला देऊन उरलेल्याचा आनंदाने उपभोग घ्यावा. असे केल्याने भय व काळजी यांना कारणच उरत नाही व मन शांत व समाधानी रहाते. मन शांत असल्यास शरीरही स्वस्थ व निरोगी राहाते म्हणून मनुष्याने असे आचरण ठेवून शंभर वर्षे सुखाने जगण्याची इर्षा ठेवावी.''

उपसंहार :

खऱ्या सुखाचे आनंदमय आयुष्य लाभण्यासाठी निरामय व स्वस्थ्य 'शरीर' त्याचप्रमाणे भयकाळजी तणावमुक्त 'मन' या दोन्ही गोष्टींची नितांत आवश्यकता असते आणि या गोष्टी (संसार-संन्यास न घेता) मिळविण्यासाठी सर्वसामान्यांसाठी माणसाने आचारावयाचा सोपा मार्गही वेदविद्येत सांगितला आहे आणि तो मार्ग भगवद्गीतेत ९ व्या अध्यायात 'राजविद्या-राजगुह्य योग' सांगून उलगडून दाखविला आहे. हा मार्ग आचरला असता, निरामय शरीराला आवश्यक असणारी विकाररहित विशुद्ध मनाची पार्श्वभूमीही उपलब्ध होते आणि त्यानंतर युक्त आहार-विहार-निद्रा ठेऊन व लागल्यास औषध व पथ्ये यांची योजना करून, स्वस्थ व निरामय शरीराच्या सहाय्याने मनुष्य खऱ्या सुखा समाधानाचे जीवन जगू शकतो. अशा तऱ्हेने (ईश्वराने मानवाला दिलेले पूर्ण असे) शतवर्षांचे आयुष्य जगण्याची ईर्षा मनुष्याने जरुर बाळगावी.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(पृष्ठ क्र.११ वरून **कौटिल्यीय अर्थशास्त्र**)

म्हणूनच पुत्राच्या सुखात आणि पुत्राच्या हितात जसे पित्याचे सुख आणि हित असते तद्वत् राजाचे सुख प्रजेच्या सुखात, राजाचे हित प्रजेच्या हितात असते. राजाला स्वतःला जे प्रिय असते त्यात त्याचे हित नसते तर प्रजेला जे प्रिय असते त्यात त्याचे हित असते असा विचार कौटिल्याने मांडला आहे.

**'प्रजासुखे सुखं राज्ञः**
**प्रजानां च हिते हितम्।**
**नात्मप्रियं हितं राज्ञः**
**प्रजानां तु प्रियं हितम्।।**

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

'उत्सवांचा' जन्म होतो. म्हणूनच आपले सगळे शाश्वत सण हे निसर्ग क्रमाशीच निगडित आहेत. एवढेच काय, पण या उत्सवांमध्ये वापरायची फुलं असोत, किंवा खायचा प्रसाद असो, हे त्या ऋतुप्रमाणे उपलब्ध असलेल्या साधनांशी, किंवा उत्पादनांशीच निगडित आहेत. माणसाच्या कल्पकतेतून या प्रक्रियेमध्ये भर पडायला लागते आणि यातून अनेक स्तोत्रं, स्तवनं, आरत्या, कथा इ. साहित्याची निर्मिती होते.

व्यक्ति, कुटुंब, मित्रपरिवार, आणि त्याही पुढे जाऊन, व्यापक मानवी समुहांचा यामध्ये जेव्हा अंतर्भाव व्हायला लागतो तेव्हा त्याला सामाजिक उत्सवाचे रूप आलेले असते. आपला धर्म किंवा देशापुरता विचार केला तरी, हिमालयापासून केरळपर्यंत हजारो वर्षे साजरा होणाऱ्या सण आणि उत्सवांमध्ये ही सुसंगती दिसून येते. फरक असला तर तो भौगोलिक कारणांमुळेच असतो. यालाच आपण 'परंपरा' म्हणतो.

या परंपरेवर मग 'समजुती' आणि 'श्रद्धे'ची पुटं चढायला लागतात. यात अदृश्य व्हायला लागतो तो या सणांमागील, निसर्गक्रमाशी जुळवून घेण्याचा मूळ हेतू, अगदी मारुतीवरती शेंदुराची पुटे चढतात तसा. मारुती ही बलोपासनेची देवता. शेंदुराच्या पुटामध्ये ती झाकली गेल्यावर बलाची उपासना 'लुप्त' होऊन, त्यावर तेलाचा अभिषेक व्हायला लागतो.

गणपती ही 'विद्ये'ची आणि 'कले'ची देवता. आजच्या गणेश उत्सवांचं स्वरूप बघितल्यावर मात्र 'विकृती'लाही सीमा नसते हेच दिसून येते. या देवतांचे झालेले उत्सवी विकृतीकरण हे सामाजिक अधःपतनाचेच लक्षण आहे.

दहीहंडी असो, गणेशोत्सव असो किंवा दुर्गापूजा असो, त्याचे झालेले आजचे 'बकाली'करण म्हणूनच गांभीर्यानी घेणे गरजेचे आहे.

हिंदुंना त्यांच्या मूर्तीपुजेमुळे पाश्चात्य धर्मप्रसारकांनी बराच त्रास दिला. 'सगुण', 'निर्गुण' किंवा 'रूप', 'अरूप' या तत्त्वज्ञानाचा गंधही नसलेल्या या धर्मप्रसारक आणि धर्म अभ्यासकांना 'मूर्ती' उपासनेमागील मानसिक विज्ञान कळलेच नाही. पण ते पाश्चात्य होते. इस्लाममध्ये नसली तरी ख्रिश्चन पंथात काही प्रमाणात मूर्तीपूजा आहे. तरीही आपल्या संस्कृतीत विकसित झालेले 'शिल्पशास्त्र' आणि 'भक्ति'चे तत्त्वज्ञान हे अत्यंत प्रगत आणि नावीन्यपूर्ण आहे. म्हणूनच आजच्या राजकारण्यांनी गणपती किंवा दुर्गेच्या उत्सवात आणलेला 'उन्माद' आणि 'बाजारू'पणा बघून दुःख होते. 'संस्कृती' आणि 'परंपरेच्या' पाठीमागे उभे राहून या विकृतीचे समर्थन करणाऱ्या या महाभागांच्या 'धर्म' संकल्पनेच्या संदर्भात असलेल्या अज्ञानाची कीव येतेच, पण त्याहीपेक्षा त्याची जास्त चीड येते.

घरच्या मूर्तीला 'देव्हाऱ्यात' बसवावे लागते, आणि सामाजिक मूर्तींना 'देवळात' बसवले जाते. मानवी कल्पकतेची साथ

मिळाल्यावर यातूनच उगम होतो तो मंदिर वास्तुशास्त्राचा. आजची आपली मंदिरे, विशेषतः दक्षिणेकडील, ही बांधकाम विज्ञानाचा अद्भूत नमुना आहेत. जिथे समाज एकवटतो तिथे समाज प्रबोधनालाही सुरुवात होते. मूर्तीची पूजा गाभाऱ्यात होते, पण तिथपर्यंतचा प्रवास हा अनेक मंडपांतून होतो. या मंडपांचे खांब, त्याच्यापायापासून छतापर्यंत कलाकुसरींनी मढवलेले असतात. ही मंदिरं म्हणजे एक मोठी विद्यापीठंच होती. त्याच्या बाह्य भागावरती रामायण, महाभारत, पंचतंत्र यांच्या कथा कोरलेल्या असत, तर नृत्याच्या अनेक मुद्रा या खांब आणि छत यांच्या कोपऱ्यांना कोरून ठेवलेल्या असत. प्रत्येक मूर्ती आणि त्याचे परिमाण हे इतके नेटके आणि व्यवस्थित आहेत की ते सौंदर्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना होऊन जाते. दक्षिणेकडील मंदिरांचे हे मंडप नाट्य, नृत्यापासून व्याकरण, तत्त्वज्ञानापर्यंतच्या ज्ञानाच्या आदान-प्रदानाची केंद्रे होती. 'भौतिक' आणि 'आध्यात्मिक' दोन्हीही मानवी गरजांची भूक या मंडपांतून भागवली जात होती. या मंदिरांतून सण आणि उत्सव साजरे होत असत. वाद्यांचे सूर हे निसर्ग आणि माणसांच्या लयींमध्ये मिसळून समाधान आणि आनंदाची निर्मिती करत होते. ती वाद्ये पूजा किंवा उत्सवांमध्ये 'उन्माद' आणि 'बळजबरी' आणत नव्हते. उत्सव हे ईश्वर चरणी लीन होण्याचे माध्यम होते, आार्थिक किंवा राजकीय फायदे घेण्याचे ते साधन नव्हते. नृत्य, नाट्य आणि संगीताच्या माध्यमातून समाजाची 'अभिरुची' विकसित करण्याचा तो प्रयत्न असे.

१२ व्या शतकातील भास्कराचार्यांच्या गणित ग्रंथांच्या अभ्यासाचे विद्यापीठ हे पाटण येथील पाटणादेवीच्या मंदिराच्या परिसरात होते तर १५ व्या शतकातील गणेश दैवज्ञानी ग्रहगणिताचे धडे हे माणगाव जवळील (नंदीग्राम) नांदगांवच्या मंदिरात घेतले.

ही मंदिरं इतर कुठल्याही देवतेची असली तरी गणपती हे 'विद्या' आणि 'कले'चे दैवत असल्यामुळे गणेशाला तिथं महत्त्वाचे स्थान आहे.

गुप्तकाळ हा आपल्या संस्कृतीच्या भरभराटीचा सुवर्णकाळ म्हणून ओळखला जातो. अभ्यासकांना गणपती उपासनेचे उल्लेख हे तेंव्हापासून मिळतात (५ वे शतक). वराहमिहीराच्या बृहद्संहीतेमध्ये गणेशमूर्ती बनवण्याची माहिती मिळते. मुंबई जवळील घारापुरी, एलोरा आणि बदामी येथील गुंफांमध्येही गणपती कोरलेले आहेत. अफगाणिस्थानामध्ये काबुल जवळ दोन गणपतींच्या मूर्ती मिळाल्या आहेत. त्यातली एक मूर्ती ही उध्वरेत या तांत्रिक मुद्रेत उभी आहे. भारतातही गणपतीची अशी मूर्ती बघायला मिळत नाही.

हिंदू संस्कृती बरोबर हिंदू मंदिरशास्त्रही दक्षिण पूर्व आशियामध्ये पोहचले. ब्रह्मदेश, इंडोनेशिया, बाली, कंबोडिया, व्हिएतनाम या सगळ्या देशांमधील मंदिरांमध्ये गणेशाच्या मूर्ती आहेत. बौद्धधर्माच्या प्रसारामुळे जपान आणि चीनमध्येही आपल्याला गणपतीच्या मूर्ती मिळतात. बौद्ध, जैन, वैष्णव, शैव

सगळ्यांच्या उपासनेमध्ये गणपतीला स्थान आहे, ते विद्येची आणि कलेची देवता म्हणूनच.

ही परंपरा असलेल्या गणपतीची आज आपण काय दुर्दशा केली आहे?

विद्या आणि कलेच्या या देवतेची पूजा आपण शाळा महाविद्यालयांना ८ दिवस सुट्टी, आणि आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकीतून बेसूर, कानठळ्या बसवणारे एकसूरी ढोल पथके बडवून, आणि द्वैअर्थी गाण्यांवर नाचून करतो. या बाजारूपणाचा आर्थिक फायदा कलाकारांनी घेतला नाही तर नवलच. हरीभक्त अवधूत गुप्ते, आणि किंचित भारी, पाळण्यातच राजकारणाचे बालकडू मिळालेले रितेश देशमुख यांनी या बाजारुपणात, आवाजी आरत्या प्रस्तूत करून खांद्यापर्यंत हात धुऊन घेतले. आता नवनिर्माण महाराष्ट्रातील शाळेतील मुलांना गणपती उत्सवाच्या आरत्या विचारल्यावर, कोंबडी पळाली, वाजले की हो बारा, पोरी जरा जपून दांडा धर, अशी उत्तरे मिळाली तर नवल वाटायला नको. शिक्षकही ताबडतोब मुलांना आठवण करून देतील, 'अरे, आवाज वाढव DJ तुला आईची..., झिंगझिंग झिंगाट विसरलात की!!!'

अर्थात परंपरेच्या नावाखाली आपल्या सणांना आलेल्या या बाजारूपणाची परंपरा ही मकरंद जोशी यांनी ११ सप्टेंबर २०१६ च्या महाराष्ट्र टाइम्समध्ये 'उत्सव आणि उन्माद' या लेखामध्ये १५० वर्षांपूर्वीच चालू झाल्याचे दाखवून दिले आहे. ते लिहितात –

''मग ठाण्यासारख्या एरव्ही सांस्कृतिक परंपरेची मिरास मिरवणाऱ्या शहरातही न्यायालयाला आव्हान देऊन दहीहंडीचे थर रचले जातात आणि सार्वजनिक वाहतुकीचा विचार न करता रस्ते अडवून गणपतीचे मांडव घातले जातात...

सन १७७४ मध्ये ठाणे शहर इंग्रजांच्या ताब्यात गेले. १८५३ मध्ये लोकांनी होळी पेटवण्यासाठी राजमार्गावर खड्डे खणून वाहतुकीला अडथळा करू नये, असा सरकारी हुकूम काढण्यात आला. या हुकूमात गैर काहीच नव्हते. लोकांनी खड्डे खोदू नयेत वा होळी साजरी करू नये, असा सरकारचा फतवा नव्हता. पण आमच्या चालिरीती आणि धार्मिक सण समारंभ साजरे करायला सरकार आडकाठी करतोय म्हणून ठाण्यातील हिंदू व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवली आणि बाजारपेठ बंद केली.''

आजच्या दहीहंडी आणि गणपती उत्सवाला आलेल्या 'बीभत्स' आणि 'व्यापारी'करणाला पायबंद घालण्याकरता मुंबई उच्च न्यायालय, आणि दिल्लीच्या सर्वोच्च न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली. सण, उत्सव साजरे करू नका असे त्यांनी कुठेही म्हटलेले नाही. तरीही आपल्या राजकारण्यांनी, न्यायालयांनी आमच्या उत्सवामध्ये हस्तक्षेप करू नये असली टीका करत, 'परंपरेने' उत्सव साजरा करा असा फतवा काढला.

कुठली ही 'परंपरा'?

रस्ते अडवून मंडप घालून, रहदारीला अडथळा करण्याची? दंडेलीनी वर्गणी वसुल करण्याची? गणपती मंडपांत ठेऊन मंडपाबाहेर, ज्यांच्यावर अनेक गुन्हे दाखल आहेत अशांची पोस्टर्स लावण्याची? आगमन आणि विसर्जनाच्या मिरवणुकीत अचकट-विचकट गाण्यावर हिडीसपणे नाचण्याची? का ध्वनी प्रदूषणाच्या सगळ्या नियमांना धाब्यावर बसवण्याची?

कुठला धर्म, कुठल्या संस्कृतीशी या परंपरेचा संबंध आहे?

दुर्दैवाने गेली काही दशकं तरी, 'धर्मा'ला 'वीर'पण आणण्याची ही परंपरा ठाण्याची आहे. याची सुरुवात ठाण्याच्या टेंबीनाक्यापासूनच झाली. सरकार आणि पोलिसांनी याकडे कानाडोळाच नाही, तर सर्व नागरी नियमांना धाब्यावर बसवणाऱ्या या उत्सवांना सोयीस्कर पाठींबाही दिला. पोस्टर्स लावून वाढदिवस साजरे करण्याची कुप्रथाही इथेच चालू झाली. याच पाठशाळेत साधे नाही पण उच्च शिक्षण घेऊन मुंबईपासून माहराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत आज या ''सांस्कृतिक परंपरेची'' पाठराखण चालू आहे. फारसे शालेय शिक्षण न घेता किंवा कुठल्याही CET च्या फंदात न पडता या नवनिर्मित महाराष्ट्रात बेरोजगारी वाढू नये म्हणून या पाठशाळेतून रोजगाराची सोय झाली.

यातूनच या सणांचे 'गुन्हेगारी'करण, 'बकाली'करण आणि 'राजकीय'करण चालू झाले. कलाकार आणि दूरदर्शनच्या वाहिन्यांना तर ही 'व्यवसाया'ची पर्वणी वाटते. अभ्यास नाही, संशोधन तर नाहीच, फक्त तरुणाई थिरकली, गणपतीबाप्पा मोरया यांची आवर्तने करत, गणपतीपेक्षा कलाकारांचीच जाहिरात करत यांचे कार्यक्रम चालू असतात. याला फारच थोडे अपवाद आहेत. सामान्य नागरिक आज या उत्सवांना विटला आहे.

'Eco-friendly' गणपती हा दुसरा 'परवलीचा' शब्द. या 'eco-friendly' गणपतीच्या सजावटीपासून मांडवापर्यंत थर्मोकोल, आणि प्लॅस्टिकच्या वस्तूंचा मुक्त वापर केलेला असतो. 'Plastor of Paris' पेक्षा, किंवा काकणभर जास्तच या वस्तू पर्यावरणाची हानी करतात. दिवसभर ध्वनी प्रदूषणांनी पर्यावरणाची हानी तर चालूच असते!!

कुठली ही 'परंपरा' आणि कुठली ही 'संस्कृती'?

सण, उत्सव, मराठी 'भाषा', आणि 'अस्मिते'चा राजकीय धंदा करणाऱ्या या नेतृत्वांनी महाराष्ट्राला आज कुठे नेऊन ठेवलं आहे?

उद्योगधंद्यामध्ये महाराष्ट्र हा एकेकाळी देशामध्ये सगळ्यात पुढारलेला होता. जाचक कामगार कायद्यांपासून, बेसुमार स्थानिक करांच्या ओझ्यामुळे देशातील इतर राज्ये आज महाराष्ट्राच्या पुढे जायला लागली आहेत. विद्यापीठांना तर एवढी अवकळा आली आहे

की परीक्षा, प्रवेश, निकाल या सगळ्या बाबतीत आज दिवाळखोरी आहे. बलात्कार, अपघात, कैदेतून चोरांचे पलायन या बाबतीत महाराष्ट्र आज आघाडीवर आहे. आय. आय. टी. प्रवेशाच्या संदर्भात एकेकाळी महाराष्ट्र हा अग्रभागी होता. अविभाजित आंध्रप्रदेश धरला तर आज महाराष्ट्राचा क्रमांक चौथा आहे. परदेशातून महत्त्वाच्या विद्यापिठांमध्ये प्रवेश मिळवण्यामध्ये आंध्रप्रदेश, आणि तामिळनाडूनी महाराष्ट्राला केव्हाच मागे टाकले आहे.

मराठीच्या बाबतीत तर काय सांगावे !! मराठी वाहिनींच्या कार्यक्रमांच्या अनेक शीर्षकांपासून, मराठी नाटक सिनेमांची शीर्षकेही इंग्रजीमध्येच!! दुकानांच्या पाट्यांपासून मराठी अस्मितेचे राजकारण करणाऱ्यांची मुले इंग्रजी माध्यमांच्या शाळेत!! मराठी ग्रंथालये, संग्रहालये, प्रगत विज्ञान-शिक्षणाकरता लागणारे पारिभाषिक शब्द निर्मिती, सगळ्या क्षेत्रात आनंद आहे. ढोल ताशे यांच्या पथकांमध्ये मात्र नेत्रदीपक, उत्साही वाढ आहे. धार्मिक, राजकीय आणि सामाजिक आघाडीवरील 'दिवाळखोर' नेतृत्वाला म्हणूनच गरज लागते ती 'भाषा', 'प्रांत', 'अस्मिता', आणि 'श्रद्धा' यांच्या भांडवलाची.

भाषा असो, सण असो किंवा उत्सव असोत, हिच 'उन्मादी' आणि 'राजकरण' ग्रस्त अशी आपली धार्मिक, आणि सांस्कृतिक परंपरा राहाणार असेल; तर दुर्गा काय, गणपती काय, किंवा खुद्द भगवान श्रीकृष्णही आपल्याला वाचवू शकणार नाहीत.

आहोत का आपण गंभीर आपल्या 'संस्कृती' आणि 'परंपरे'बद्दल?

विसर्जनाचा प्रत्येक दिवस हा सर्वसामान्य नागरिकाकरता 'भय' दिवस असतो. आपले उत्सव, परंपरा आणि धर्माच्या रक्षणाची जबाबदारी न्यायालय, सरकार आणि पोलिसांची नाही. ज्या संख्येने आपण या धांदलीत सामिल होतो ते बघितल्यावर आत्मपरिक्षणाची आणि स्वेच्छा निर्बंधांची जबाबदारी ही आपलीच आहे.

तुम्ही श्रीकृष्णाचे, दुर्गेचे आणि गणपतीचे खरे भक्त असाल, तर थांबवा या उत्सवांच्या व्यापारी आणि गुन्हेगारीकरणाला.

सरकार आणि पोलिसांच्या नाकर्तेपणाला जाब विचारा आणि ठरवा खोटं मार्क्सच्या वचनाला की, -

'धर्म ही अफूची गोळी आहे.'

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१